सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. ०६ एप्रिल २०२५ | वर्ष तिसरे | अंक ०५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## 'मुख्यमंत्री फेलोशिप २०२५ - २६'ची घोषणा, साठ तरुणांना प्रशासनासोबत काम करण्याची संधी

मुंबई : महाराष्ट्रातील तरुण पिढीला राज्याच्या प्रशासनासोबत काम करण्याची संधी मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील 'मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०२५-२६' जाहीर करण्यात आला आहे. या कार्यक्रमात साठ तरुणांना प्रशासनासोबत काम करण्याची संधी मिळणार आहे. या तरुण - तरुणींना ज्ञानाच्या, अनुभवाच्या कक्षा रुंदावण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. तरुणाईतील कल्पकता, वेगळा विचार मांडण्याची क्षमता, उत्साह, तंत्रज्ञानाची आवड यांचा उपयोग प्रशासनास व्हावा आणि या माध्यमातून प्रशासकीय प्रक्रियांमध्ये गतिमानता यावी यासाठीच 'मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०२५-२६' जाहीर करण्यात आला आहे.

'मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०२५-२६' साठी निवडीसंदर्भातील निकष, नियुक्तीसंदर्भातील अटी व शर्ती तसेच शैक्षणिक संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमाची रूपरेषा व अंमलबजावणीबाबत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत हा कार्यक्रम सुरू केला. त्यावेळी हा कार्यक्रम यशस्वी झाला होता. यंदा पुन्हा 'मुख्यमंत्री फेलोशिप' हा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. कार्यक्रमाची अंमलबजावणी नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत केली जाईल.

निकष : अर्जदार भारताचा नागरिक असावा.

शैक्षणिक अर्हता : कोणत्याही शाखेतील पदवीधर, किमान साठ टक्के गुण आवश्यक

अनुभव : किमान १ वर्षाचा पूर्णवेळ कामाचा अनुभव आवश्यक. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी



त्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पूर्णवेळ इंटर्नशिप / अप्रेंटीसशिप /आर्टीकलशिपसह १ वर्षाचा अनुभव आवश्यक. पूर्णवेळ स्वयंरोजगार, स्वयंउद्योजकतेचा अनुभवही ग्राह्य धरण्यात येईल. अर्जदारास तसे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल.

भाषा व संगणक ज्ञान : मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक. हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. संगणक हाताळणी आणि इंटरनेटचे ज्ञान आवश्यक.

वयोमर्यादा : अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास किमान २१ वर्षे व कमाल २६ वर्षे असावे.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाद्वारे विहित केलेल्या ऑनलाईन ॲप्लिकेशन प्रणालीद्वारे उमेदवाराने अर्ज करावयाचा आहे.

अर्जाकरिता शुल्कः- रुपये ५००/-

या कार्यक्रमात फेलोंची संख्या ६० इतकी निश्चित करण्यात आली असून, त्यापैकी महिला फेलोंची संख्या फेलोंच्या एकूण संख्येच्या १/३ राहील. १/३ महिला फेलो उपलब्ध न झाल्यास त्याऐवजी पुरुष फेलोंची निवड करण्यात येईल. फेलोंचा दर्जा हा शासकीय सेवेतील गट-अ अधिकाऱ्यांच्या समकक्ष असेल.निवड प्रक्रिया :- फेलोशिपसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास ऑनलाईन अर्ज करून ऑनलाईन परीक्षा शुल्क भरावे लागेल. तसेच ऑनलाईन अर्ज करताना आधार कार्ड किंवा अन्य ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. परीक्षा शुल्क भरणाऱ्या उमेदवारास ऑनलाईन वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षा जपश्रळपश (जलक्षशलींळींश ढशीींं) द्यावी लागेल.

ऑनलाईन परीक्षा देण्याची कार्यपद्धती संचालनालयाच्या ारहरवशी.ारहरीरीहींर.सेीं. ळप या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल व त्यातील अटी व शर्तीचे उमेदवाराने पालन करणे आवश्यक राहील. यापूर्वी मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमात काम केलेले फेलो पुनश्चः या कार्यक्रमांतर्गत फेलो निवडीसाठी पात्र असणार नाहीत. तसे फेलोंनी अर्जात नमूद करणे आवश्यक राहील.

## जादूटोणा प्रतिबंधक कायदा धार्मिक प्रथांना लागू नाही; मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

### जादूटोणा प्रतिबंधक कायदा धार्मिक प्रथांना अपवाद, अंधश्रद्धा रोखण्यासाठीच कायद्याचा हेतू

मुंबई : महाराष्ट्रातील अघोरी प्रथा आणि काळी जादू रोखण्यासाठी करण्यात आलेला जादूटोणा प्रतिबंधक कायदा (२०१३) हा धार्मिक आणि पारंपरिक प्रथांवर नाही, तर हानिकारक आणि भ्रामक अंक्ळसहधश्रद्धा, मानवी बळी, फसवे उपचार आणि मानसिक शोषण यासारख्या गोष्टींवर रोख आणण्यासाठी आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, जादूटोणा प्रतिबंधक कायदा (२०१३) हा अमानवी प्रथा, फसव्या विधी आणि मानसिक शोषण थांबवण्यासाठी लागू करण्यात आला आहे. तो पारंपरिक, धार्मिक प्रथा किंवा सांस्कृतिक-कलात्मक अभिव्यक्तींवर लागू होत नाही.

न्यायालयाने हे निरीक्षण गुजरातमधील स्वयंघोषित बाबा रमेश मधुकर मोडक उर्फ शिवकृपानंद स्वामी यांच्याविरोधातील खटल्यात पुण्यातील मॅजिस्ट्रेट न्यायालयाने दिलेल्या मुक्ततेच्या आदेशावर शिक्कामोर्तब करताना नोंदवले. मोडक यांच्यावर काळी जादू प्रचाराचा आरोप पुण्याचे रहिवासी रोहन विश्वास कुलकर्णी यांनी केला होता.

काय आहे प्रकरण?

कुलकर्णींनी तक्रार दाखल करताना सांगितले की, २०१२ मध्ये पुण्यातील शिवाजीनगर येथे मोडक यांच्या कार्यशाळेत त्यांनी सहभाग घेतला होता. त्या कार्यशाळेत मोडक यांनी आपल्याला भविष्य पाहण्याची आणि युवकांना करिअर मार्गदर्शन करण्याची अलौकिक शक्ती असल्याचा दावा केला होता.

यानंतर कुलकर्णींनी गुजरातच्या नवसारी येथे मोडक यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना वैयक्तिक भेट नाकारण्यात आली.

२०१३ मध्ये पुण्यात आठ दिवसांची आणखी एक कार्यशाळा झाली, ज्यात मोडक स्वतः उपस्थित नव्हते, परंतु आयोजकांनी सांगितले की, स्वामी subtle body (सूक्ष्म शरीर) द्वारे संवाद साधणार आहेत. रोज दोन तासांची प्रवचन CD दाखवण्यात आली, जी २५० रुपयांना विकण्यात आली होती. आयोजकांच्या म्हणण्यानुसार, ही उऊ मोडक यांच्या शक्तीने पूजित होती.

यानंतर कुलकर्णींनी ४५ दिवसांचा ध्यान अभ्यास केला, ज्यामुळे त्यांना मानसिक आणि शारीरिक त्रास झाल्याचा दावा त्यांनी केला. मोडक यांचे वकील सिद्धार्थ सुतारिया यांनी युक्तिवाद केला की, ही कार्यशाळा आणि उऊ २०१२ मध्येच होती, जेव्हा काळी जादू प्रतिबंधक कायदा अंमलात आलेला नव्हता. शिवाय, या कार्यशाळांचे आयोजन मोडक यांनी केले नसून, तेथे त्यांच्या उपस्थितीचा कोणताही पुरावा नाही.

## १२२ कोटींच्या सहकारी बँक घोटाळ्यातील मुख्य आरोपीच्या ब्रेन मॅपिंग चाचणीचा अहवाल 'पॉझिटिव्ह', ईओडब्ल्यूची माहिती

मुंबई : मुंबईतील न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळाप्रकरणी तपास करत असलेल्या आर्थिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि माजी महाव्यवस्थापक हितेश मेहता याच्या ब्रेन मॅपिंग चाचणीचा अहवाल पॉझिटिव्ह आला असून, तो त्याच्या सहभागाची पुष्टी करणारा असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

ही ब्रेन इलेक्ट्रिकल ऑस्सिलेशन सिग्नेचर नावाची फॉरेन्सिक मानसशास्त्रीय चाचणी कालिना फॉरेन्सिक प्रयोगशाळेत पार पडली. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, जरी ही चाचणी न्यायालयात थेट पुरावा म्हणून वापरता येत नाही, तरी ती आमच्या तपासाच्या निष्कर्षांना पाठिंबा देते आणि मेहता याच्या भूमिकेची पुष्टी करते.

या घोटाळ्यात मेहतासह माजी अध्यक्ष हिरेन भानू (सध्या फरार), उएज अभिमन्यू भोन, आणि मेहताचे सहकारी धर्मेश पौन व अरुणाचलम उल्लहनाथन मारुथुवर यांचाही सहभाग असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

११ मार्च रोजी मेहतावर लाई डिटेक्टर (पॉलीग्राफ) चाचणी करण्यात आली होती. मात्र, तो सतत आपले जबाब बदलत होता आणि तपासात सहकार्य करत नव्हता. त्यामुळे त्याच्यावर इएजड चाचणी करण्यात आली.

एजथ च्या तपासानुसार, २०१९ ते २०२५ दरम्यान मेहताने बँकेच्या तिजोरीतून पैसे चोरून धर्मेश पौन आणि उल्लहनाथन यांच्याकडे सुपूर्द केले, जे पैसे परस्पर वापरण्यात आले. १२ फेब्रुवारी रोजी रिझर्व्ह बँकेने प्रभादेवी आणि गोरेगाव शाखांवर तपासणी केल्यानंतर हा घोटाळा उघडकीस आला, आणि त्यानंतर मेहताने गुन्ह्याची कबुली दिली.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांमध्ये माजी उएज अभिमन्यू भोन, उल्लहनाथनचा मुलगा मनोहर आणि कपिल देढिया यांचा समावेश आहे.

## शेतीसाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब आवश्यकः ना.विखे पाटील

### महाराष्ट्र सिंचन परिषदेचे उद्‌घाटन संपन्न

नगर : पूर्वी शेतीसाठीच सिंचन व्यवस्था होती. परंतु औद्योगीकरण आणि शहरीकरणामुळे शेतीसाठी उपलब्ध पाणी कमी होत असल्याने, पारंपरिक सिंचन पद्धतीत बदल करून आधुनिक तंत्रज्ञानाचा सिंचनासाठी शेतकऱ्यांनी वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

सांगोला महाविद्यालयात आयोजित २१ व्या महाराष्ट्र सिंचन परिषदेत मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या परिषदेत आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार शहाजी बापू पाटील, जलसंपदाचे सचिव डॉ. संजय बेलसरे आदींचा समावेश होता. या कार्यक्रमात विविध जिल्ह्यातून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की,



दुष्काळमुक्त महाराष्ट्र

जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील यांनी सांगितले की, महाराष्ट्र सरकारचे धोरण आहे की राज्याला पूर्णपणे दुष्काळमुक्त करणे राज्याचे धोरण असून,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली त्याची कार्यवाही सुरू आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पुराचे अतिरिक्त पाणी वाया जाऊ नये म्हणून नदी जोड प्रकल्पांना चालना दिली जात आहे. राज्याची सिंचन क्षमता पूर्वी ३.८६ लाख हेक्टर होती, आता ती ५५ लाख हेक्टरवर पोहोचली आहे. यात आणखी वाढ करण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब करण्यावर जोर देऊन पाण्याचे व्यवस्थापन आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा प्रभावी वापर करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

आज वातावरणातील बदलाचा मोठा परीणाम सिंचन व्यव्सथेवर होतो.यासाठी सोलर पॅनलच्या वापरामुळे धरणांवर वीज निर्मिती होईल आणि पाण्याचे बाष्पीभवन कमी करण्याचे शासनाचे प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. उजनी धरणात वाळू आणि गाळ जमा झाल्यामुळे पाण्याची साठवणूक क्षमता कमी झाली आहे, याबाबत लवकरच उपाय योजना करण्यासाठी विभागाचे प्रयत्न असल्याचे त्यांनी आश्वस्त केले.

यापुर्वी महाराष्ट्र पाणी परिषदेच्या माध्यमातून स्व.बाळासाहेब विखे पाटील आणि गणपतराव देशमुख यांनी पाणी उपलब्ध होण्यासाठी मोठे काम केले.त्यांना दि.मा.मोरे यांच्या सारख्या अभ्यासू लोकांची साथ मिळाली आज त्यांच्या प्रस्तावांना पुढे घेवून जाण्याचे काम राज्य सरकार करीत आहे.महाराष्ट्र सिंचन सहयोग या संस्थेच्या माध्यमातून होत असलेल्या ही परिषदेतून येणार्या सूचना आणि शिफारसी राज्य सरकार निश्चित स्विकारेल आशी ग्वाही त्यांनी आपल्या भाषणात दिली.

प्रदूषण आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा

मंत्री विखे पाटील यांनी नदीकाठच्या शहरांमधून प्रदूषणयुक्त पाण्याचा उत्सर्जनामुळे प्रभावित गावांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी एकत्रित पाणीसाठे करण्याबाबत विचार करण्याची आवश्यकता व्यक्त केली. अनेक धरणात गाळ साठल्याने पाणी क्षमता कमी झालेली असून धरणातील गाळ काढून पाण्याची साठवण क्षमता वाढवण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. ही सिंचन परिषदेच्या माध्यमातून सिंचन व्यवस्थापनाबाबत नागरिकांच्या सूचना आल्यास शासन त्यावर सकारात्मक विचार करून त्या अनुषंगाने धोरण तयार करेल, असे त्यांनी नमूद केले.

सिंचन प्रकल्पांना गती

जलसंपदाचे सचिव संजय बेलसरे यांनी सांगितले की, सांगोला तालुक्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी सिंचन प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. सिंचन व्यवस्थापनात आवश्यक बदल सुचवल्यास, त्या सूचना जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सोडविल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्वयंचलित हवामान केंद्राचे उद्घाटन

यावेळी भारतीय हवामान खात्याकडून स्थापित स्वयंचलित हवामान केंद्राचे उद्घाटन जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या यंत्राद्वारे हवेतील तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग, दिशा आणि पर्जन्यमानाची माहिती पुण्यातील हवामान विभागाला पाठविली जाते. ही माहिती व त्या अनुषंगाने आवश्यक सूचना स्थानिक शेतकऱ्यांना मोबाइलद्वारे पाठवण्याचे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

सिंचन परिषदेत सिंचन सहयोग संस्थेचे अध्यक्ष डॉ. दि. मा. मोरे आणि सांगोला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब आणि जलसंपदाचे योग्य व्यवस्थापन हे महाराष्ट्राच्या शेतीच्या भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. व यामुळे शेतकऱ्यांना लाभ मिळेल असे त्यांनी सांगितले.

## मानवतेच्या कल्याणासाठी जैन समाजाचे एकजूटतेचे आवाहन; ९ एप्रिल रोजी विश्व नवकार महामंत्र जाप

भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त येत्या ९ एप्रिल २०२५ रोजी नवकार दिनाचे औचित्य साधून विश्व कल्याणासाठी सकल जैन समाज, जितो परिवार आणि नवकार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामुदायिक विश्व नवकार महामंत्र जपाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात शहर आणि जिल्ह्यातील जैन तसेच अन्य धर्मीय बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जितो परिवाराचे अध्यक्ष अनिल कुमार संचेती आणि मुख्य सचिव आशिष सकलेचा यांनी केले आहे.

सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगरच्या वतीने एस.बी. कॉलेजच्या प्रांगणात सकाळी ७ ते ९.३० या वेळेत हा कार्यक्रम पार पडणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नवकार पठणाने होणार असून यात भक्तीगीते, दीप प्रज्वलन आणि साध्वीजींचे आशीर्वाद असतील. गेल्या २५ वर्षांपासून जैन समाजात असलेली एकोपाची भावना अधिक दृढ करण्यासाठी सर्व संप्रदायातील लोक एकत्र येऊन हा जप करतील. या कार्यक्रमाद्वारे छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक नवकार जप करून विश्वविक्रम करण्याचा संकल्प करण्यात आला आहे, असे सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्र दर्डा यांनी सांगितले. शहरातील सर्व नवकार उपासकांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सरस्वती भवन महाविद्यालयात सकाळी सात ते साडेनऊ या वेळेत हा कार्यक्रम होणार असून, यात भारतासह १०८ देश, १०० पेक्षा अधिक संस्था, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, कलाकार, उद्योजक, धर्मगुरू, खेळाडू यांच्यासह अनेक व्यक्ती आणि संस्था सहभागी होणार आहेत.

या उपक्रमात छत्रपती संभाजीनगरमधील जितो लेडीज विंग, जितो युथ विंग, जैनम महिला मंच, अरिहंत ग्रुप, जयगुरु मिश्री मंडळ, परमेषठी ग्रुप, गुरु परिवार, नमो परिवार, युथ सोशल फोरम, गोल्डन ग्रुप, वर्धमान रेसिडेन्सी युवक ग्रुप, बाहुबली ग्रुप, दक्षिण मध्ये युवा ग्रुप, हडको गुरु भक्त परिवार, रॉकर्स ग्रुप, गुरुभक्त परिवार, सिडको रॉयल ग्रुप, जैन सोशल ऑर्गनायझेशन, स्वस्ति ग्रुप, आगम युवा ग्रुप, अखिल भारतीय जैन दिवाकर मंच, जैन कॉन्फरन्स युवा परिवार, आनंद युवक मंडळ, हडको, ओसवाल जैन ट्रस्ट, भारतीय जैन संघटना, जैन सोशल ग्रुप, संगिनी ग्रुप, १०८ गो सेवा ग्रुप, श्री जैन अलर्ट ग्रुप, पार्श्वधर्म महिला मंच, तेरापंथ युवका परिषद, जैन टॅग, त्रिशला महिला मंच, तेरापंथ कन्या मंडळ, संस्कार महिला मंच, पुलक मंच दि. जैन युवक मंडळ, राजाबाजार जैनम ग्रुप, जैन इंजी. सोसायटी, संगिनी ग्रुप, परमेठी युवक ग्रुप, राजाबाजार दि. जैन महिला मंडळ, जागर्स ग्रुप, मारवाडी ग्रुप, नवकार फाऊंडेशन, वैजापूर, पैठण, सिल्लोड, लासुर, गंगापूर येथील सकल जैन समाजाचा सक्रिय सहभाग असणार आहे.

या कार्यक्रमासाठी श्री वर्धमान श्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघ, श्री १००८ शांतीनाथ अग्रवाल दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट, सराफा, हडको श्री खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर, राजाबाजार, श्री छ. संभाजीनगर जैन श्वेतांबर मुर्तिपुजक श्री संघ, श्री आनंदजी कल्याणजी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट, श्री जैन श्वेतांबर तेरापंथ सभा, छ. संभाजीनगर, श्री सकल सैतवाल दिगंबर जैन समाज यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

विश्व नवकार महामंत्र दिन हा जैन समाजातर्फे आयोजित एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. आत्मशुद्धी आणि आध्यात्मिक विकासाच्या माध्यमातून जगाचे कल्याण साधणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. हा कार्यक्रम सर्व समाजातील लोकांना एकत्र आणून एकता आणि सद्भावनेचा संदेश देईल.

नवकार फाउंडेशनच्या वतीने या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्यांसाठी २७ नवकार कलशांच्या लकी ड्रॉची घोषणा करण्यात आली आहे. जितो छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष अनिल कुमार संचेती यांनी नवकार फाउंडेशनचे प्रकल्प प्रमुख रवी मुगदिया आणि त्यांच्या टीमला सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आहे. नवकार फाउंडेशनने या कार्यक्रमात विशेष सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली आहे. या कार्यक्रमात नवकार महामंत्राचे प्रदर्शनही आयोजित केले जाणार आहे.या विश्व नवकार दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी www.navkardivas.jitoworld.org या लिंकवर नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## हमीभावाच्या तुलनेत हरभरा विक्रीत ५०० रुपयांचा घाटा; कृषी पणन मंडळाने सुरू केली खरेदी

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : हमीभावाच्या तुलनेत किमान ५०० रुपये कमी फरकाने हरभरा पिकाचे बाजारभाव कोसळले आहेत. त्यामुळे सोयाबीनप्रमाणे हमीभावात हरभरा खरेदीचा निर्णय राज्य कृषी पणन मंडळाने घेतला आहे. त्यासाठी नोंदणी प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू करून १ एप्रिलपासून हरभरा खरेदी सुरू करण्यात आली आहे.

केंद्र सरकारच्या आयात धोरणामुळे ऐन हंगामात हरभरा पिकाचे बाजारभाव कोसळले आहेत. मागील वर्षी ८ हजार रुपये प्रतिक्विंटल दरापर्यंत विक्री झालेला हरभरा सध्या ५,१०० रुपये दराने विकला जात आहे. त्याचा शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे.

हरभरा विक्री करावी की साठवणूक करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समितीत हरभऱ्याचा दर किमान ५१०० आणि कमाल ५१५० रुपये आहे. गंगापूर ५,३६६ आणि सिल्लोड बाजार समितीत ५,१०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. केंद्र सरकारने २०२४-२५ या रब्बी हंगामासाठी हरभरा पिकाला ५,६५० रुपये हमीभाव जाहीर केला आहे. मात्र, प्रत्यक्ष बाजारपेठेत ५०० रुपये कमी दराने हरभरा विकला जात आहे. खुल्या बाजारातही दर कमी असल्यामुळे शेतकरी भरडला जात आहे.

हरभरा पिकाची नुकतीच काढणी झाली असून, शेतकरी जास्त प्रमाणात हरभरा विक्रीसाठी आणत आहेत. त्यामुळे बाजारभाव अधिक कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सोयाबीनप्रमाणे हमीभावानुसार हरभरा खरेदी करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती. काही राज्यात हमीभावानुसार हरभरा खरेदी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य कृषी पणन मंडळाने राज्यात हमीभावानुसार हरभरा खरेदीचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, एक एप्रिलपासून खरेदी करण्यात येत आहे.

८ लाख टन खरेदीचे उद्दिष्ट

महाराष्ट्रात ७ लाख ८ हजार टन हरभरा खरेदीचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे. पुरेसा पाऊस झाल्यामुळे हरभरा क्षेत्र वाढले आहे. त्यामुळे उत्पादनातही वाढ झाली असून, हरभरा विक्रीसाठी गर्दी होण्याची शक्यता आहे. सोयाबीन खरेदीप्रमाणे हरभरा खरेदीत विस्कळीतपणा नसावा. शेतकऱ्यांना सुलभ पद्धतीने हरभरा विक्री करता यावा, अशी उपाययोजना करावी, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

### हरभरा ठेवला साठवून

**यंदा अनुकूल पाउसमानामुळे हरभऱ्याचे चांगले उत्पादन झाले. मात्र, भाव समाधानकारक मिळत नसल्यामुळे आम्ही विक्री न करता हरभरा साठवून ठेवला आहे. सरकार हमीभाव जाहीर करते, मात्र त्यानुसार बाजारभाव मिळत नाही. त्यातून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळे तुर्त हरभरा न विकलेलाचा बरा.**

**- रामचंद्र लहाने, शेतकरी**



# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## विविध पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शांतता कमिटीची बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.५ एप्रिल -**

चाकूर येथील पोलिस स्टेशन येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक बी. चंद्रकात रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक समाधान चवरे यांच्या उपस्थितीत दि.४ एप्रिल रोजी सकाळी शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली.

शहरातील विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, श्रीराम नवमी समितीचे पदाधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीचे पदाधिकारी, मुस्लिम बांधव व तालुक्यातील विविध गावांतील नागरीक उपस्थित होते.

पोलिस निरीक्षक समाधान चवरे यांनी उपस्थित पदाधिकारी यांना नवमी व जयंती विषयी येणाऱ्या अडचणी व जयंती साजरी करीत असतानाच्या नियमावली समजून सांगितले.

साऊंड सिस्टीमचा आवाज शासनाने ठरवून दिलेल्या डिसेबल नुसार असावा, बॅनर व झेंडे शक्यतो उंचावर लावले जावे, मोठ्या आवाजाचा डिजे वापरू नये, कर्नक्रकश आवाजामुळे नागरीकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, लेझर वापरू नये, जयंती साजरी करताना सामाजिक उपक्रम राबविले जावे, जयंती समितीला पोलिस प्रशासनाकडून काय अपेक्षा आहे याचीही माहिती पोलिस निरीक्षक समाधान चवरे यांनी समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून जाणून घेतले.

## संक्षिप्त वृत्त...



### मुख्याध्यापिका बबिता मगर यांचा सत्कार

**देवणी, दि.५ एप्रिल -**

तालुक्यातील लासोना जि.प. शाळेच्या मुख्याध्यापिका बबिता धनाजीराव मगर-इंचुरे या ३७ प्रदिर्घ सेवेतून निवृत्त झाल्या. त्याबद्दल शुक्रवारी शाळेत त्यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला. अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तुकाराम माने होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, देवणीच्या नगराध्यक्षा डॉ. कीर्ती घोरपडे, उपनगराध्यक्ष अमित मानकरी, गटविकास अधिकारी सागर वरंडेकर, उपविभागीय कृषी अधिकारी श्रेयस यादव, तालुका कृषी अधिकारी कृष्णा मुंडे, गटशिक्षणाधिकारी संजय शिंदाळकर, पोलीस उपनिरीक्षक गोपाळ वऱ्हाडे तसेच लासोना ग्रामपंचायत सरपंच धनराज मठपती, उपसरपंच अंकुश माने, चेअरमन सुभाष माने, भाऊसाहेब पाटील, अण्णाराव पाटील, कृषी सहाय्यक प्रितम कारभारी, रवीकिरण मोरे, रितेश टोकले, कृषी पर्यवेक्षक व्ही.व्ही. सुर्यवंशी, दिगंबर पाटील, हरिभाऊ माने, दत्ता महाराज लासोणकर, भरत निलेवाड, बबनराव रोकडे, विजयकुमार चव्हाण, केशव नरवटे, सर्जेराव भांगे, किशनराव बिरादार आदी उपस्थित होते.



### लखनगावे यांच्या वतीने मुख्याधिकारी भराट यांना निरोप

**शिरूर अनंतपाळ, दि.५ एप्रिल -**

शिरुर अनंतपाळ नगरपंचायतीचे कार्यतत्पर व कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी दिपक भराट यांची सहाय्यक वाहतुक निरीक्षक (RTO) पदी निवड झाल्याबद्दल नगरसेवक सुधीर लखनगावे यांच्या वतीने त्यांचा सत्कार करुन निरोप देण्यात आला. मुख्याधिकारी दिपक भराट २६ ऑगस्ट २०२४ रोजी नियुक्त झाल्यापासुन ते आजतागायत अवघ्या ७ महिन्याच्या कालावधीत त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या प्राथमिक गरजा, समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. याबरोबरच त्यांनी विवीध शहरातील निधीअभावी रखडलेले विवीध विकास कामे तात्काळ सुरु केले. कायम पाणीपुरवठा योजना, घनकचरा व्यवस्थापन, वसुंधरा ५.० अभियान, प्लास्टीक बंदी, कार्यालयीन शिस्त, प्रधानमंत्री घरकुल आवास योजना, माता रमाई घरकुल आवास योजना, दलित स्मशानभुमी शुशोभीकरण याबरोबरच विवीध लोकाभिमुख कामे तात्काळ मार्गी लाऊन अल्प कालावधीमध्ये शिरुर अनंतपाळ करांचे मने जिंकली. यावेळी उमाकांत शिंदाळकर गुरुजी, दत्ता शिंदे, संतोष शिवणे उपस्थित होते.

## केंद्रीय मनरेगाला ग्रामरोजगार सहाय्यकांचा ब्रेक

**२०० कोटीचे कामे बंद... आंदोलन सुरु... थकीत मानधन तात्काळ देण्याची मागणी...**



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.५ एप्रिल -**

तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नो कमिटी ओन्ली डिबीटीचे आश्वासन देऊनही गेल्या सहा महिन्यापासून मानधन मिळत नसल्याने औसा तालुक्यातील ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेच्या वतीने कामबंद आंदोलन दोन दिवसापासून सुरू करण्यात आले असून १०९ कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला आहे. यामुळे जवळपास २०० कोटी रुपयांच्या केंद्र सरकारच्या मनरेगाच्या कामांना ब्रेक लागला आहे.

शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी रोजगार सेवकांच्या मानधन बाबतचा अध्यादेश काढत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई येथील मेळाव्यात 'नो कमीटी ओन्ली डिबीटी' आश्वासन दिले होते. सहा महिने उलटूनही आश्वासनानुसार रोजगार सेवकांच्या वैयक्तिक खात्यावर अजूनपर्यंत मानधन जमा केलेले नाही. ग्रामीण ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत हजारो मजुरांच्या हाताला काम देण्याचे व्यवस्थापन करणारे रोजगार सेवक स्वतः च्या संसाराचा गाडा पैशाअभावी चालविण्यात असमर्थ ठरत आहेत. मनरेगा सारखी योजना ग्रामरोजगार सेवकांनी प्रभावी अंमलबजावणी करुन प्रगतीपथावर आणली. अशा या मनरेगाचा मुख्य कणा असलेल्या ग्रामरोजगार सेवकांची सहनशीलता पूर्णपणे संपलेली आहे. तुटपुंज्या मानधनावर रोजगार सेवक काम करीत असून गेल्या सहा महिन्यांपासून मानधन मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबियावर उपासमारीची वेळ आली आहे.

शासनाने शासन निर्णयाप्रमाणे रोजगार सेवकांचे मानधन द्यावे. महागाई भत्ता बाबत कार्यवाही, विमा संरक्षण, मानधन वैयक्तिक खात्यात जमा करावे, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

बालाजी रेड्डी, भागवत शिंदे, बालाजी उबाळे, विठ्ठल पांचाळ, मुक्तारभाई शेरीकर, अंकुश जाधव, सचीन पळसे, गोरख कांबळे, धनराज देडे, तात्याराव कांबळे, सोमनाथ डोके, पद्माकर तौर, ज्ञानेश्वर पोतदार, ओम पाटील, दिपक सोनवते, प्रदिप जाधव, संभाजी जाधव, नेताजी निकम, तानाजी उजळंबे, परमेश्वर बनसोडे, रमाकांत सुर्यवंशी, धनराज रणदिवे, अप्पासाहेब घाडगे, नवनाथ कांबळे, एकनाथ जाधव, महेश यादव यांच्यासह अनेक रोजगार सहाय्यक यांच्या सह्या आहेत.

## शाळा व्यवस्थापन समित्या कागदावरच

### पालकांनी सावध राहण्याची गरज

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.५ एप्रिल**

शाळा व्यवस्थापन समिती ही शाळेच्या विकासाचा महत्त्वाचा दुवा असूनही, अनेक ठिकाणी ती केवळ कागदावरच अस्तित्वात असल्याचे चित्र आहे. समितीच्या सदस्यांना त्यांच्या अधिकारांची आणि जवाबदारीची पुरेशी माहिती नसल्याने, शाळेच्या विकासात त्यांचा सहभाग अत्यंत मर्यादित राहतो. निवडणुकीच्या वेळी सदस्य मोठ्या उत्साहाने पुढे येतात; मात्र निवडणुकीनंतर ते शाळेकडे पाठ फिरवतात. परिणामी, शाळेच्या मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांचे कल्याण आणि शैक्षणिक गुणवत्ता याकडे दुर्लक्ष होत आहे.

शाळा व्यवस्थापन समितीची रचना ही शासनाने ठरवलेल्या नियमांनुसार असते. समितीत १२ ते १६ सदस्यांचा समावेश असतो. त्यामध्ये ७५ टक्के सदस्य विद्यार्थी पालक असतात आणि त्यापैकी किमान ५० टक्के महिला असणे बंधनकारक असते. याशिवाय, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ञ यांचाही सहभाग असतो. शाळेच्या विकासासाठी समितीला काही महत्त्वाच्या जवाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत.

शालेय विकास आराखडा तयार करणे, शाळेच्या खर्चावर देखरेख ठेवणे, शिक्षणाच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवणे, शाळेतील गैरप्रकार रोखणे आणि विद्यार्थी गळती कमी करण्यासाठी प्रयत्न करणे, या महत्त्वाच्या जवाबदाऱ्या आहेत, मात्र, प्रत्यक्षात समिती या गैरहजेरी, शुल्कासंबंधी तक्रारी, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचे मुद्दे हाताळणे, विद्यार्थी गळती शाळा व्यवस्थापन समितीचे अधिकार आणि जबाबदाऱ्या शालेय विकास आराखडा तयार करणे, शाळेच्या मूलभूत सुविधांची पाहणी करून त्यावर उपाययोजना करणे, मुलांसाठी दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, शाळेच्या खर्चांवर देखरेख ठेवणे, शाळेला मिळणाऱ्या निधीचा योग्य विनियोग होत आहे का, याची पाहणी करणे, गरजू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, मदतीची व्यवस्था पाहणे, शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी लक्ष देणे, शिक्षक वेळेवर उपस्थित राहतात का, याची पाहणी करणे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळतेय का, यावर नियंत्रण ठेवणे, शाळेतील गैरप्रकार रोखणे ह्या शाळा व्यवस्थापन समितीचे अधिकार आणि जबाबदाऱ्या आहेत. मात्र याकडेच समितीकडून दुर्लक्ष केले जात आहे.

समितीच्या सदस्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि अधिकाराविषयी समजावून सांगणे गरजेचे आहे. तसेच, पालकांनीही शाळेच्या कामकाजात सक्रिय सहभाग घ्यायला हवा.

शाळा व्यवस्थापन समित्या सक्षम झाल्यास, शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढेल, शिक्षक शाळेत वेळेवर येतात का? वेळेवर येवून विद्यार्थ्यांना अध्यापन करतात का? अशा अनेक प्रकारच्या स्थानिक पातळीवर शाळांच्या समस्या सुटण्यास मदत होईल. आणि यामुळे शाळेची पटसंख्या वाढण्यास मदत होईल मात्र, यासाठी समिती सदस्यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची गरज आहे; अन्यथा ही समिती केवळ कागदावरच राहील.

## शिरूर अनंतपाळ तालुक्याला अवकाळीने झोडपले

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.५ एप्रिल -**

शिरूर अनंतपाळ तालुक्याला गुरूवारी सायंकाळी साडेपाच च्या दरम्यान अवकाळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले.जवळपास एक तासाहून अधिक काळ विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस कोसळत होता. या पावसामुळे रब्बी ज्वारी व गव्हाचे मोठे नुकसान तर आंब्याच्या झाडाखाली आंब्याचा सडा पडल्याने बागायतदारांची चिंता वाढली आहे. त्यात लाईट गायब व्यावसायिक, नागरिकांना त्रास सहन करावा लागला.

वातावरणात झालेल्या अचानक बदलामुळे गुरुवारी दुपारपासून वादळी वारा सुरू झाला व त्यात पावसाळी वातावरण निर्माण झाले. त्यानंतर सायंकाळी सुरू झालेल्या जोरदार पावसामुळे रब्बी ज्वारी व गव्हाचे नुकसान झाले तर या पावसामुळे आंबा व भाजीपाला वर्गीय पिकांवर संकट आले आहे. या पावसामुळे भाजीपाला सडून उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे.

वादळी वाऱ्यासह पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून याचा पशुपालकांना देखील फटका बसला आहे.

## 'लाल बहादूर शास्त्री'च्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परिक्षेत यश

**उदगीर, दि.५ एप्रिल -**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक योजना परीक्षा २०२४-२५ चा निकाल फेब्रुवारी महिन्यात जाहीर झाला होता. या परीक्षेची गुणवत्ता यादी दि.१ एप्रिल रोजी जाहीर झाली असून लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील ४ विद्यार्थी एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र ठरले.

तर सारथी शिष्यवृत्तीसाठी ७ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. व ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून पात्र झालेले विद्यार्थी प्रांजल भगवान पाटील ११० गुण, भक्ती दिनेश देवनाळे १०५ गुण, स्मिता अनिल पाटील १०४ गुण, प्रज्वल संजय राठोड ८१ गुण.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी गुलाब पुष्प देऊन केले.

याप्रसंगी उपस्थित विद्यालयाचे पर्यवेक्षक कृष्णा मारावार पर्यवेक्षक किरण नेमट एनमएमएस विभाग प्रमुख दिलीप पाटील हे उपस्थित होते

एनएमएमएस शिष्यवृत्ती पात्र ठरलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, शंकरराव लासुणे, सतनप्पा हुरदळे, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, अरुण पत्की, कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, दिलीप पाटील व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## २१ लाख रुपयांचा मदत निधी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांकडे सुपूर्द

**आ. अभिमन्यू पवारांचा पुढाकार...**
**औसा मतदार संघातील नागरिकांचे सहकार्य...**



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.५ एप्रिल -**

मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला सहकार्य करण्याची इच्छा मतदारसंघातील अनेकांनी व्यक्त केली. यामुळे औसा विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आर्थिक मदत करण्याची घोषणा आमदार पवार यांनी केली. यास नागरिकांनी उत्फुर्त प्रतिसाद दिला असून बुधवार दि. २ रोजी पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकाऱ्यांसह मस्साजोग येथे देशमुख कुटुंबीयांची भेट घेऊन औसा मतदार संघातील नागरिकांनी जमा केलेला २१ लाख रुपयांचा मदत निधी आ. अभिमन्यू पवार यांनी कुटुंबियाकडे सुपूर्द केला आहे.

माणुसकीला काळिमा फासणाऱ्या बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देषमुख यांच्या निर्घृण हत्येने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. या घटनेस जबाबदार असणाऱ्यांना कडक शिक्षा व्हावी. यासाठी आमदार अभिमन्यू पवार राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. काही दिवसांपूर्वी बीड येथे निघालेल्या आक्रोश मोर्चेत सहभागी होत आ. पवारांनी आपल्या संतप्त भावना त्यांनी व्यक्त केल्या होत्या. यानंतर तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन घटनेचे गांभीर्य सांगून याबाबत कडक पावले उचलावीत. अशी मागणी केली होती. तर या प्रकरणाची दखल घेत कडक शासन करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले होते.

पीडित देशमुख कुटुंबियांना आर्थिक मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने मतदारसंघातील गावागावात निधी संकलनाचे आवाहन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले. या आवाहनाला प्रतिसाद देत मतदारसंघातील नागरिकांनी २१ लाख रुपयांचा निधी जमा केला. मतदारसंघातील सर्व जाती धर्मांच्या लोकांनी एकत्र येत जमा केलेला निधी आ. अभिमन्यू पवार यांनी बुधवारी देशमुख कुटुंबीयांना सुपूर्द केला.

यावेळी संतोष देशमुख यांचें बंधू धनंजय देशमुख यांच्या सोबत झालेल्या भेटीत त्यांनी काही मागण्या सरकारकडे व्यक्त केल्या यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुर्णपणे देशमुख कुटुंबीयांच्या पाठीशी उभे असून देशमुख कुटुंबीयांनी व्यक्त करण्यात आलेल्या अपेक्षा मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचवण्याचा शब्द यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी दिला आहे.

भाजपाचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, औसा बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे, संचालक रमेश वळके, तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, शहराध्यक्ष सुनील उटगे, तालुका निराधार समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे आदी उपस्थित होते.

## मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केली पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.५ एप्रिल -**

तालुक्यात अवकाळी पावसामुळे मतदारसंघातील अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर तालुक्यातील अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली तालुक्यात नांदुरा, गोताळा, लिंगदाळ, बेलूर, तेलगाव, मेथी या गावासह सपूर्ण तालुक्यात कमी अधिक प्रमाणात पिके व फळझाडांचे नुकसान झाले. अनेक ठिकाणी घरावरील पत्रे उडाली. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने विद्युत सोलार तसेच आजूबाजूच्या परिसरातील विद्युत



खांब मोठ्या प्रमाणात पडले होते. तात्काळ महावितरणशी संपर्क साधून विद्युत खांब बसवून वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे आदेश दिले. प्रसंगी नुकसान झालेल्या शेतकरी बांधवांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. तसेच प्रशासकीय स्तरावर संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

समवेत भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, उपजिल्हाधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगारकर, ता.कृषी अधिकारी बावगे, ता. अध्यक्ष शिवाजीराव देशमुख, अविनाश देशमुख, माजी सरपंच गंगाधर गुरमे, संदीपान गुरमे यांसह नांदुरा, गोताळा, लिंगदाळ येथील शेतकरी बांधव, पोलिस, शासकीय अधिकारी पत्रकार उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिवापर टाळून पुस्तकी ज्ञान आत्मसात करावे : न्यायाधीश लुनिया



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.५ एप्रिल -**

चाकूर तालुक्यातील राचन्नावाडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यालयात दि.३ एप्रिल रोजी सकाळी ९:३० वाजता चाकूर तालूका विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने कायदा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चाकूर न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश व्ही.एस. वाघमोडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सहदिवाणी न्यायाधीश एम.एस. लुनिया, न्यायालयाचे सहायक अधीक्षक, तसेच वकील संघाचे अध्यक्ष ॲड. एस.व्ही. गंभीरे, सचिव ॲड.एम.सी. शेख, मुख्याध्यापक बी.बी. खडके, संस्थेचे अध्यक्ष टिळे एम.एस. आदी मान्यवर उपस्थित होते.

न्यायाधिश व्ही.एस. वाघमोडे यांनी कायद्याविषयी मार्गदर्शक केले तसेच जागतिक वसुंधरा दिन, जागतिक आरोग्य दिन, बालकामगार दिन आदी विषयांवर न्यायाधिश वाघमोडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थांनी शाळेतून निरोप घेण्या अगोदर प्रत्येकांनी एक तरी झाडं लावले पाहिजे असा सामाजिक संदेश न्यायाधिश वाघमोडे यांनी दिले.

तर सह न्यायाधिश एम.एस. लुमीया यांनी कायद्याविषयी मार्गदर्शक केले व विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिवापर टाळून जास्तीत जास्त पुस्तकी ज्ञानावर भर देऊन नवनवीन शैक्षणिक गोष्टी जाणून घेतल्या पाहिजेत.

आई-वडीलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी इतर मार्गाला न लागता अभ्यासावर लक्ष केंद्रित करून आपले व आपल्या आई वडीलांचे स्वप्न पूर्ण करावे, गुरूजनांचा आदर करावा असा अनमोल सल्ला सह न्यायाधिश लुनिया यांनी दिला.

यावेळी ॲड.एस.डी. शिवपूरकर, ॲड.एस.व्ही. फड, ॲड. रणजीत पाटील, ॲड. मेघराज सुळ, न्यायालयीन कर्मचारी, पोलिस पाटील गुणवंतराव पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष तुकाराम वागलगावे, तलाठी मिराबाई नाईकवाडे, गावातील नागरीक तसेच ॲड.एस.डी. शिवपूरकर, ॲड.एस.व्ही. फड यांनीही मार्गदर्शन केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक बिरादार एस.सी., बरूरे के.पी., पेटकर टी.एन., चव्हाण एस.आर, कांबळे पी.जी., सुरवसे एस.पी, मलिशे सतीश आदींनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन ॲड.एस.बी. मलिशे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक भगवान खडके यांनी मानले.

## दैठणा येथे आर्ट ऑफ लिव्हिंगची बैठक


**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.५ एप्रिल**

आर्ट ऑफ लिविंग चे मकरंद जाधव यांच्याकडून दैठणा येथे प्राथमिक स्वरूपातील बैठक घेण्यात आली आणि या बैठकीमध्ये दैठणा येथे आर्ट ऑफ लिव्हींगचे सहादिवशीय शिबिर कधी घ्यायचे याबद्दल प्राथमिक स्वरूपातील चर्चा झाली आणि या चर्चेला स्थानिक लोकांकडून खूप छान प्रतिसाद भेटला या चालू आठवड्यातच सहा दिवसाचे शिबिर घेण्याचे ठरले.

या बैठकीचे अध्यक्ष म्हणून मकरंद जाधव यांच्याकडून स्थान भूषविण्यात आले आणि यांच्या अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये कार्यक्रमाचे महत्त्व आरोग्य साक्षरता आपल्या प्रत्येकाच्या अस्तित्वाची ओळख अशा अनेक विषयावरती यांच्याकडून अतिशय छान पैकी मार्गदर्शन झाले. तर ओमप्रकाश गलबले यांच्याकडून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यात आले.

या बैठकीला चंदरराव पाटील, योगीराज बिरादार, सदविवेक मिरकले, बापूसाहेब पाटील, निळकंठ बिरादार, अनिल तोटे, ॲड. राजीव सांगवे, राजीव जमालपुरे, भरत पेंटमशेटे, धनु महाराज, राम सांगवे, दशरथ पाटील, रशीद शेख या सर्वांकडून उपस्थिती लावण्यात आली.

## संघ हीच जीवनगाथा




अलकः- (८१) शिस्तपालन

१९३० साली माधवरावांना काशी विश्वविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी मिळाली होती. तिथेच विद्यार्थी त्यांना गुरुजी म्हणू लागले होते. तिथेच श्री भैय्याजी दाणी, पंडित मदनमोहन मालवीय यांच्याशी पण गुरुजींची मैत्रीपूर्ण ओळख झाली. पंडितजींनी विद्यापीठाच्या परिसरात संघ शाखेसाठी जागा दिली होती. एकदा तिथल्या कार्यक्रमाची सारी जबाबदारी गुरुजींनी घेतली होती. सारे स्वयंसेवक व्यवस्था पहात होते. कोणी कुठे बसावे, स्त्रियांनी कोणत्या दाराने आत यावे हे पक्के ठरले होते. पण एक प्राध्यापक महाशय स्त्री दरवाजातून आत प्रवेश करते झाले. स्वयंसेवकांनी त्यांना नम्रपणे इथून प्रवेश करू नका, पुरुषांसाठी दुसरा दरवाजा आहे, असे सांगितले. पण त्यांना हा एका प्राध्यापकाचा अपमान वाटला. मग स्वयंसेवकांनी त्यांना खांद्यावर उचलले व दुसऱ्या दरवाजातून आत आणून योग्य स्थानी बसवले. कार्यक्रमानंतर या प्राध्यापकांनी खूप मोठा कंगावा केला. पण गुरुजी आणि

मालवीयजींनी शिस्तपालनाची त्यांना योग्य समज दिली. संघ स्वयंसेवकांचा कोणताही छळ झाला नाही. ही गोष्ट डॉक्टर हेडगेवार यांना कळली. आणि त्यांनी संघाची शाखा उघडण्यासाठी गुरुजींना कलकत्त्याला पाठवले. गुरुजींनी तेथील क्रांतिकारकांची पार्श्वभूमी, साम्यवादाचा प्रभाव, रूढीग्रस्त समाज, आपल्या प्रांताचा अतिरेकी अभिमान, अशा वातावरणात सुद्धा संघाचे रोपटे रुजविले. १९३९ च्या गुढीपाडव्याच्या सुमुहूर्तावर संघ स्थापना शाखेच्या माध्यमातून करण्यात आली. आणि तीन जुलै १९४० रोजी संध्याकाळी श्री गुरुजी सरसंघचालक म्हणून घोषित झाले. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती




# आता रोबोट करणार गुडघे आणि नितंबावर शस्त्रक्रिया

## मेडिकव्हर रुग्णालयात रोबोटिक तंत्रज्ञानाच्या आविष्कारातून शस्त्रक्रिया घडणार

छत्रपती संभाजीनगर : सध्याच्या काळात गुडघा आणि नितंब दुखण्याच्या समस्या केवळ वृद्धांपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहीत. अनेकांना दैनंदिन आयुष्यात गुडघेदुखी आणि नितंबदुखीच्या असह्य वेदना जाणवत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. गुडघे आणि नितंबदुखीचा वाढता त्रास लक्षात घेत छत्रपती संभाजीनगरातील मेडिकव्हर रुग्णालयाने आता रोबोटच्या मदतीने गुडघे आणि नितंब दुखणीवर वेदनाविरहित उपाय शोधला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आता नवी छत्रपती संभाजीनगरातील मेडिकव्हर रुग्णालयात रोबोट गुडघे आणि नितंब बदलांची शस्त्रक्रिया केली जाईल. रोबोटच्या साहाय्याने वेदनाविरहित शस्त्रक्रिया करणे शक्य झाल्याने रुग्णांना फारसा त्रास जाणवार नाही. अचूक शस्त्रक्रियेचे आव्हान आता रोबोटच्या मदतीने शक्य झाल्याने रुग्ण लवकर बरा होतो, काही दिवसांतच चालायलाही लागतो, अशी माहिती डॉक्टरांनी दिली.

जिल्हा पालक आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि राज्याचे इतर मागासवर्गीय मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत शनिवारी रुग्णालयात झालेल्या एका कार्यक्रमात मेडिकव्हर रुग्णालयाने रोबोटिक सर्जरी तंत्रज्ञानाचे औपचारिक उद्घाटन केले.

चुकीची जीवनशैली, स्थूलत्व, संधिवात आणि दुखापतींमुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच गुडघेदुखीचा आणि नितंबदुखीचा



त्रास जाणवू लागला आहे. या त्रासाने सर्व वयोगटातील लोकांना दैनंदिन आयुष्यातही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. रोजचे आयुष्य जगताना येणाऱ्या मर्यादा लक्षात घेत रुग्णांनी आता डॉक्टरांकडे धाव घेतली आहे. या वाढत्या रुग्णांबाबत डॉक्टरांनी चिंता व्यक्त केली. ही समस्या ध्यानात घेत छत्रपती संभाजीनगरातील मेडिकव्हर रुग्णालयातील डॉक्टरांनी आता मिस्सो तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे. ही तंत्रज्ञान प्रणाली रोबोटच्या मदतीने रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करते.

मेडिकव्हर रुग्णालयात ६८ वर्षीय महिला रुग्णावर रोबोटच्या मदतीने गुडघा बदल शस्त्रक्रिया पार पडली. ही महिला गुडघ्याच्या संधीवाताने हैराण झाली होती. शस्त्रक्रिया यशस्वी पार पडल्यानंतर ६८ वर्षीय वृद्ध महिला कोणाचीही मदत न घेता स्वतःहून चालू लागली. या महिलेवर शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉक्टरांनी मिस्सो उच्च-तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णांवर शस्त्रक्रिया करणाऱ्या रोबोटची मदत घेतली. मिस्सो रोबोटिक प्रणालीच्या मदतीने रुग्णांवर आता अचूक शस्त्रक्रिया साधणे अजूनच सोप्पे झाले आहे.

शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्यानंतर छत्रपती संभाजीनगरातील मेडिकव्हर रुग्णालयाकडून पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मेडिकव्हर रुग्णालयाचे ऑर्थोपॅडिक डॉक्टर डॉ. किशोर मुंडे , यांनी वाढत्या गुडघेदुखीच्या रुग्णांबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, '' आजकाल तरुणांमध्ये गुडघा दुखणीच्या समस्यांचे प्रमाण वाढत आहे. या दुखणीतून बरे होण्यासाठी पारंपरिक शस्त्रक्रिया प्रभावी असल्या तरीही त्यातून रुग्णांना बरे होण्यास बराच वेळ लागतो. अंदाजे ७० टक्के लोकांना कधी ना कधी आयुष्यात गुडघा दुखण्याचा त्रास जाणवतो. त्यापैकी १०-२० टक्के रुग्णांना गुडघे किंवा बदलाची शस्त्रक्रिया करावी लागते. मिस्सो तंत्रज्ञानावर आधारित रोबोटिक शस्त्रक्रिया ही वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञानाचा आविष्कार मानला जात आहे. डॉक्टरांना रोबोटच्या मदतीने गुडघे बदल शस्त्रक्रियेत अचूकता साधणे शक्य झाले आहे. बरेचदा शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णांच्या शरीरातील रक्त वाया जाते. आता ही भीतीही दूर सरली गेली आहे. ही शस्त्रक्रिया संक्रमणाचा धोका कमी करते. परिणामी, रुग्णाचा रुग्णालयीन मुक्काम कमी राहतो. रुग्ण थोड्या दिवसांतच पूर्णपणे बरा होतो. या तंत्रज्ञानामुळे डॉक्टरांना रिअल-टाइम फीडबॅक मिळतो, ज्यामुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित व परिणामकारक ठरते.

मेडिकव्हर रुग्णालयाचे केंद्र प्रमुख डॉ. दीपेन शाह यांनी मिस्सो ऑर्थो सर्जिकल रोबोटच्या कार्यक्षमतेबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, ''मिस्सो ऑर्थो रोबोट थ्रीडी इमेजिंग खास कारणांसाठी डिझाईन करण्यात आले आहे. या रोबोटच्या मदतीने शस्त्रक्रियेत अचूकता साधता येते. रुग्णाच्या शरीरातील मऊ ऊतींचे जतन करता येते. इम्प्लांट योग्य रित्या बसवता येतो. परिणामी, शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या शरीरात तातडीने सुधारणा दिसून येतात.

मेडिकव्हर रुग्णालयाच्या महाराष्ट्र विभागाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनीही या नव्या रोबोटिक तंत्रप्रणालीबद्दल आपले मत मांडले. ते म्हणाले, '' आम्ही रुग्णसेवा पुरवताना नावीन्यतेवर भर देतो. नवनवीन तंत्रज्ञानाचा आविष्कार अंमलात यावा, याकडे आमचा कटाक्ष आहे. जेणेकरुन रुग्णांनाही सुरक्षितता लाभेल, आरामदायी उपचार घेता येतील. '' मेडिकव्हर रुग्णालयामार्फत अशा नाविन्यपूर्ण उपचारपद्धतींनी मराठवाड्यात वैद्यकीय क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू केला आहे.

# निपूण महाराष्ट्र उपक्रमा अंतर्गत जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे चावडी वाचन

सोयगाव,दि.५ एप्रिल :सोयगाव केंद्रातील नाविण्यपूर्ण उपक्रमशील जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे निपूण महाराष्ट्र उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांचे चावडी वाचन काळेनगर येथिल चौकात सोयगांव केंद्राचे केंद्र प्रमुख फिरोज तडवी यांच्या प्रमुख उपस्थित तसेच शालेय व्यवस्थापन समिती,माता पालक संघ अध्यक्ष,उपाध्यक्ष,सदस्य,मुख्याध्यापक,शिक्षक यांच्या उपस्थित शाळेतील वर्ग दुसरी ते चौथीतील निपूण विद्यार्थ्यांनी



वाचन तसेच संख्यागणन केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बाबत केंद्र प्रमुख फिरोज तडवी यांनी समाधान व्यक्त करून पालक,विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले.पालकांनीही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बाबत समाधान व्यक्त करून मुख्याध्यापक,शिक्षक यांचे अभिनंदन केले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाळेतील निपूण विद्यार्थ्यांचे तसेच नव्याने वर्ग पहीली मध्ये प्रवेश घेतलेल्या नवगतांचे स्वागत करण्यात आले. चावडी वाचनासाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील तसेच सहशिक्षक,प्रशिक्षक शिक्षक यांनी परिश्रम घेतले.यावेळी पालक वर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १५५/२०२५

अर्जदार : १) अनिता किशोर राकडे, वय ३३ वर्ष, धंदा-धरकाम, २) नमता किशोर राकडे, वय १५ वर्ष, धंदा- शिक्षण, ३ अंजली किशोर राकडे, वय-१२ वर्ष, धंदा- शिक्षण, ४ प्रणव किशोर राकडे, वय-०८ वर्ष, धंदा- शिक्षण, सर्व रा. दस्तापूर, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) अर्जदार क्र. २ ते ४ साठी अ.पा.क. आई म्हणून अर्जदार क्र. १.......

।। विरुध्दः//

गैरअर्जदारः कोणीही नाही

प्रकरणः वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत किशोर काशिनाथ राकडे हे दिनांक ०३/०५/२०२३ रोजी दस्तापूर ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार है मयत किशोर काशिनाथ राकडे यांचे वारस असून त्यांना शासकीय कामकाजासाठी व शासकीय योजनांचे लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०७/०५/२०२५

आज दिनांक ५/४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांय यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १६१/२०२५.

अर्जदार : १. सुनिता एकनाथराव कुलकर्णी, वय. ७५ वर्षे, धंदा. घरकाम, २. अरविंद एकनाथराव कुलकर्णी, वय. ५५ वर्षे, धंदा. नौकरी, दोघेही रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,

-विरुध्द-

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांने वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत एकनाथ नारायण कुलकर्णी हे दि. २८/०७/२००७ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत एकनाथ नारायण कुलकर्णी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह अजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख : ०७/०५/२०२५.

आज दि. ०५/०४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिल्वे

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

# दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल निलजगावं मध्ये वार्षिक बक्षीस कार्यक्रम उत्साहात संपन्न

बिडकीन दि ५ एप्रिल पैठण तालुक्यातील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल निलाजगावं येथे मोठ्या उत्साहात वार्षिक बक्षिस वितरण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून. दादासाहेब कुशेकर , सचिन मोगल , संगीता मोगल , प्रतिष्ठित व्यक्ती. मनीषा हुड यांची उपस्थिती लाभलेली होती. प्रमुख पाहुण्यांनी दीपप्रज्वलन करून माता सरस्वती यांच्या प्रतिमेस हार अर्पण केले. शाळेचे संस्थापक ओमप्रकाश जैस्वाल,



सचिव राजेंद्र जैस्वाल, मुख्याध्यापक मयुर स्वामी यांनी प्रमुख पाहुण्यांचे शब्द सुमंनानी सत्कार केला. तसेच वर्षभरात विविध खेळांमध्ये सहभागी विद्यार्थी यांना कौतुक करण्यासाठी प्रमूख पाहुण्याच्या हस्ते विद्यार्थि यांना मेडल व प्रमाणपत्र देउन त्यांचा मनोबल वाढविले . प्रमूख पाहुण्यानी सर्वांना मार्गदर्शन केलें कार्यक्रमाचे सुत्र संचालन मयुर स्वामी यांनी केले आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप झाला .शिक्षकवृंद प्रतीक्षा बत्ताले ,आरती कावरे , या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी परीश्रम घेतले.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयांय यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १५८/२०२५.

अर्जदार : १. अफसर शेरीफ तडवी, यय. ४२ वर्षे, धंदा. मजुरी, २. अरास्तुलाबाई शरीफ तडवी, वय, ७६ वर्षे, धंदा, घरकाम, ३. सकिंदर शरीफ तडवी, वय. ३९ वर्षे, धंदा. मजुरी, ४, पिरखा शरीफ तडवी, वय, ३४ वर्षे, धंदा. मजुरी, ५. लुकमान शरीफ तडवी, वय. २७ वर्षे, धंदा. मजुरी, सर्व रा. टिटवी पळासखेडा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

-विरुध्द-

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांने वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत शरीफ शमशेर तडवी हे दि. २७/१०/२०१८ रोजी मोजे. टिटवी पळासखेडा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत शरीफ शमशेर तडवी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह अजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीखः ०५/०५/२०२५.

आज दि. ०४/०४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर,
सोयगांव.

## जाहिर प्रगटन

**मा.विंद पाटिल साहेब दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.क्रि. अर्ज.क्र.२०४/२०२५ पुढील तारीख २/५/२०२५.

अर्जदार :- १. शेख उस्मान शेख हुसेन, वय ५८ वर्षे, धंदा-नोकरी, रा. बडा कुवा बडा बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. शेख नूर शेख हुसेन, वय ४८ वर्षे, धंदा मजुरी, रा. बडा कुवा बडा बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. शेख कामरान रफिक यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ व २ हे मयताचे मुलगे आहेत. अर्जदार क्रं. १ व २ हे आपसात भाऊ आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे रशिदाबी हुसेन शेख व हुसेन नुरोद्दीन शेख यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्रं. १ व २ यांचे वडील नामे मयत हुसेन नुरोद्दीन शेख हे दि. २८/०६/१९९४ रोजी मौजे बडा बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे तसेच अर्जदार क्रं. १ व २ यांची आई नामे मयत रशिदाबी हुसेन शेख हि दि. १९/०९/२०१७ रोजी मौजे बडा बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे वृद्धपकाळामुळे मरण पावली आहे. अर्जदार क्रं. १ व २ यांना रशिदाबी हुसेन शेख व हुसेन नुरोद्दीन शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ व २ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे व त्यांचे मयत आई व वडील नामे रशिदाबी हुसेन शेख व हुसेन नुरोद्दीन शेख हे मौजे बडा कुवा बडा बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. येथील मुळचे रहिवाशी होते तसेच ते बडा कुवा बडा बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ व २ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि. १८/०३/२०२५ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २८/०३/२०२५

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायलय के स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क २९७/२०२५

अर्जदार : १) उत्तम नाना खाजेकर, वय. ५४ वर्षे, धंदा. मजुरी रा. मालुंजा खुर्द ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) संजय नाना खाजेकर, वय. ४९ वर्षे, धंदा. मजुरी रा. मालुंजा खुर्द ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, नाना केरू खाजेकर हे मालुंजा खुर्द ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. २०/११/२०२४ रोजी वृध्दपकाळाने मालुंजा खुर्द ता. गंगापूर येथे मयत झाले असून त्यांच्यापुर्वी त्यांची पत्नी सुंदरबाई नाना खाजेकर या बऱ्याच वर्षापुर्वी मरण पावले असून ज्यावेळी अर्जदार अज्ञान होते. मयतांना अर्जदार हेच वारस असून अर्जदारां व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत नाना केरू खाजेकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर



## अग्रलेख...

# हेच आहेत मुस्लिम समाजाचे खरे शत्रू

समाजाच्या आणि देशाच्या व्यापक हिताचे तसेच मुस्लिम समाजातील तळागाळातील वर्गाच्या कल्याणाचे प्रवेशद्वार असलेल्या वक्फ दुरुस्ती विधेयकाला संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यामुळे त्याचे आता कायद्यात रूपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लोकसभेत हे विधेयक पारित होण्यात काहीच अडचण नव्हती. कारण सभागृहात भाजपाजवळ स्पष्ट बहुमत आहे, पण राज्यसभेत भाजपाजवळ स्पष्ट नाही तर काठावरचे बहुमत होते. त्यातच काही पक्षांनी ऐनवेळेवर विधेयकाला विरोध करण्याची भूमिका घेतल्यामुळे सरकार अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, भाजपातील तसेच मोदी सरकारमधील चाणक्यांनी या पेचप्रसंगातून यशस्वीपणे मार्ग काढला आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय हे विधेयक पारित झाले. लोकसभेत विधेयकाच्या बाजूने २८८ तर विरोधात २३२ मते पडली. राज्यसभेत विधेयकाच्या समर्थनार्थ १२८ तर विरोधात ९५ मते पडली. एखाददुसरा अपवाद वगळता रालोआतील पक्षांनी विधेयकाच्या बाजूने तर इंडिया आघाडीतील पक्षांनी विरोधात मतदान केले. लोकसभेत २८८ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केले असले, तरी २३२ जणांनी विरोधात मतदान केले, ही वस्तुस्थिती आहे. या २३२ सदस्यांनी असे करत वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या विरोधात नाही तर व्यापक राष्ट्रहिताच्या विरोधात मतदान केले, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. राष्ट्रवादी मुस्लिमांचा या सदस्यांनी एकप्रकारे विश्वासघात केला, हे नाकारता येणार नाही. संसदेत या विधेयकाला कडाडून विरोध करीत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी मुस्लिमांच्या लांगूलचालनासाठी आपण कुठल्याही थराला जाऊ शकतो; वेळप्रसंगी हिंदूंच्या पाठीत खंजीरही खूपसू शकतो, हे दाखवून दिले. या विधेयकावरून काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी मोठ्या प्रमाणात अपप्रचार केला तसेच मुस्लिम समाजाची दिशाभूल करण्याचाही प्रयत्न केला. वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या माध्यमातून मुस्लिमांच्या धार्मिक व्यवहारात हस्तक्षेप करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचा तसेच मुस्लिम समाजाचे अधिकार हिरावणारे हे विधेयक असल्याचा धादांत खोटा आणि खोडसाळ प्रचार काँग्रेस आणि अन्य विरोधक करीत होते. मुस्लिम समाजाच्या धार्मिक व्यवहारात हस्तक्षेप करणारे हे विधेयक नाही तर संपत्तीच्या सुयोग्य व्यवस्थापनाचे विधेयक असल्याचा खुलासा सरकारने वेळोवेळी केला. यावर काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी विश्वास ठेवला नसला, तरी सुदैवाने मुस्लिम समाजाने विश्वास ठेवला. झोपेत असलेल्याला उठवणे सोप असते, पण झोपेचे सोंग घेतलेल्यांना उठवणे कठीण असते, असे म्हटले जाते. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची अवस्था अशीच झाली आहे. काँग्रेसने आपल्या राजकीय स्वार्थासाठी मुस्लिम समाजाचा व्होट बँक म्हणून पुरेपूर उपयोग करून घेतला. असे करताना त्याने मुस्लिम समाजाच्या कल्याणासाठी तसेच विकासासाठी काहीच केले नाही. मुस्लिम लोकांना जाणीवपूर्वक देशात दुय्यम नागरिकत्व दिले. या देशात मुस्लिमांचे जेवढे नुकसान काँग्रेसने केले तेवढे दुसरे कोणीच केले नाही. तरी मुस्लिम समाजाचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. याचे कारण देशातील मुस्लिमांनी आतापर्यंत डोळे बंद करून काँग्रेसवर विश्वास ठेवला होता.

भाजपा मुस्लिम समाजाच्या विरोधात असल्याचा अपप्रचार काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष आधीपासूनच करीत होते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात भाजपाचे सरकार आल्यानंतर या अपप्रचाराला जोर आला. भाजपा मुस्लिम समाजाचा शत्रू नाही तर खरा मित्र आहे, हे भाजपाचे राधामोहनदास अग्रवाल यांनी राज्यसभेतील आपल्या भाषणातून स्पष्ट केले. मोदी सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचे सर्वांत जास्त लाभार्थी मुस्लिम बांधव असल्याचे त्यांनी पुराव्यानिशी दाखवून दिले. काँग्रेस आणि अन्य विरोधकांनी वक्फ दुरुस्ती विधेयकातील तरतुदी काळजीपूर्वक वाचल्या असत्या, थोडा अभ्यास केला असता, आपल्या डोळ्यावरील राजकीय हेतूचा चष्मा काढला असता तर या विधेयकाला विरोध करण्याची त्यांची हिंमतही झाली नसती. या विधेयकावर काँग्रेस, राजद, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि आपसह अन्य पक्षांच्या नेत्यांनी केलेली भाषणे ऐकल्यावर तर माणसाने खोटे तरी किती बोलावे, असे वाटून गेले. या सर्व पक्षांच्या नेत्यांची भाषणे खोटे बोल पण रेटून बोल अशी होती. सर्वांत आश्चर्य वाटले शिवसेना उबाठाच्या भूमिकेचे. उबाठाच्या खासदारांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान करीत आपल्या अकलेचे दिवाळे निघाल्याचे दाखवून दिले. आज बाळासाहेब ठाकरे जिवंत असते तर आपल्या दिवट्या चिरंजीवाचे राजकीय प्रताप पाहून त्यांनी आपले डोके पिटून घेतले असते. याचसाठी मी शिवसेना काढली का, असा प्रश्न त्यांना पडला असता. या विधेयकाला आमचा विरोध नव्हता, तर नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या विरोधामुळे आम्ही विधेयकाला विरोध करण्याची भूमिका घेतल्याचा हास्यास्पद दावा उबाठाने केला आहे. असा दावा करीत मोदी आणि शाहांच्या द्वेषाने आपण आंधळे झाल्याचे त्यांनी दाखवून दिले. असे करीत आपल्या भूमिकेचे समर्थन उद्धव ठाकरे यांना करता येणार नाही. उद्धव ठाकरे स्वत:च्या नाही तर दुसऱ्याच्या म्हणजे स्वत:ला अतिशय शहाणे समजणाऱ्या, पण प्रत्यक्षात दीडशहाणे असलेल्या सोंगाड्याच्या ओंजळीने पाणी पितात, त्यामुळे त्यांची स्वत:ची आणि शिवसेनेची ही अवस्था झाली आहे. विशेष म्हणजे सकाळी उठल्याबरोबर भोंगा लावणाऱ्या सोंगाड्याने शिवसेना संपवण्याची सुपारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडून घेतली आहे. स्वत:ला डोके नसले की असेच होत असते. उद्धव बाळासाहेब ठाकरे हिंदुत्वापासून दूर गेल्यामुळे तसेच बाळासाहेबांच्या मार्गावर चालण्यासाठी आपल्याला शिवसेना सोडावी लागली, असा जो दावा शिवसेनेचे एकनाथ शिंदे वारंवार करत आहेत, त्यांचा हा निर्णय योग्य असल्याची खात्री यातून पटते. उद्धव ठाकरे यांचे वर्णन आधुनिक काळातील जिना असे केले तर ते चुकीचे ठरणार नाही. मोदी आणि शाह यांच्या आंधळ्या द्वेषातून तसेच हिंदुत्वाच्या विरोधात घेतलेल्या भूमिकेमुळे उद्या उद्धव ठाकरे यांनी आपली आणि आपल्या आदुबाळाची सुंता करून घेतली तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

संसदेच्या दोन्ही सभागृहांत मोदी सरकारला अपशकुन करण्यासाठी टपून बसलेल्या काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी आता तोंडावर पडल्यानंतर वक्फ दुरुस्ती विधेयकाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचा इशारा दिला आहे. यासोबत काँग्रेसने देशातील मुस्लिमांना रस्त्यावर उतरण्यासाठी भडकावणे सुरू केले असे दिसते. अन्यथा शुक्रवारच्या नमाजानंतर देशाच्या काही भागात मुस्लिम समाज रस्त्यावर उतरला नसता. अजूनही वेळ गेली नाही. विधेयकात नेमके काय आहे, याबाबत काँग्रेस नेते जे सांगतात, त्यावर विश्वास न ठेवता मुस्लिम समाजातील विचारवंतांनी स्वत: या विधेयकाचा अभ्यास करावा आणि त्यानंतर आपले मत बनवावे. आज देशात रेल्वे आणि संरक्षण विभागानंतर सर्वांत जास्त जमीन वक्फ मंडळाकडे आहे. रेल्वे आणि संरक्षण विभागाजवळ असलेल्या जमिनी ही सरकारची म्हणजे पर्यायाने देशातील जनतेची संपत्ती आहे. पण वक्फ मंडळाकडे असलेल्या जमिनीची मालकी काही मूठभर लोकांकडे आहे, जिचा मुस्लिम समाजातील सर्वसामान्य गरीब लोकांना कोणताही फायदा होत नाही. वक्फच्या ताब्यात असलेल्या जमिनीचा मुस्लिम समाजातील गरीब वर्गाला फायदा व्हावा म्हणून तसेच या जमिनीवर नागासारखा फणा काढून बसलेल्या मूठभर लोकांच्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सरकारने हे विधेयक आणले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. तीन तलाकनंतर मोदी सरकारचा हा दुसरा मोठा ऐतिहासिक निर्णय म्हटला पाहिजे. तीन तलाक रद्द करण्याचा निर्णय जसा मुस्लिम समाजातील महिलांच्या व्यापक हिताचा होता, तसा वक्फ दुरुस्ती विधेयक मुस्लिम समाजातील शोषित, वंचित, पीडित वर्गासाठी आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. या मुद्यावरून राजकारण करणाऱ्यांना, मुस्लिम समाजाची दिशाभूल करणाऱ्यांना, त्यांना भडकवणाऱ्या काँग्रेस आणि अन्य विरोधकांना त्यांची जागा आणि लायकी नेहमीसाठी दाखवून देण्याची वेळ आली आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# हिंदुत्वाच्या मिशा कशा असतात?

सर्वप्रथम यंदाच्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाला पूर्ण बहुमत मिळालेले नसतानाही वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक लोकसभेत मंजूर झाले याबद्दल सर्व भारतीयांचे अभिनंदन! पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचा संघ (टीम) एक मिशन घेऊन चालत आहेत, हे स्पष्ट आहे. आपल्याला कोणत्याही नेत्याचे महानत्व मोजायचे असेल तर एक प्रश्न आपल्याला विचारता आला पाहिजे. ''जर अमुक अमुक नेता नसता तर काय झालं असतं?'' मोदींच्या राजकारणाचा आढावा घेताना मला हा प्रश्न नेहमीच पडतो की ''जर मोदी नसते तर काय झालं असतं?'' जर मोदी नसते तर सर्जिकल स्ट्राईक झालं नसतं. पाकिस्तानची दादागिरी सुरूच राहिली असती. जर मोदी नसते तर काश्मीरमधून ३७० हटवलं गेलं नसतं. हिंदूंचा बळी पडत राहिला असता. जर मोदी नसते तर तिहेरी तलाक कायदा आला नसता. मुस्लिम माता-भगिनींची किंकाळी कुणीच ऐकली नसती. जर मोदी नसते तर ठिकठिकाणी शौचालये बांधली गेली नसती. माता-भगिनींची समस्या कोणालाच कळली नसती. जर मोदी नसते तर अमेरिकेसारखा बलाढ्य देश आपला मित्र झाला नसता. अमेरिकेने नेहमीच आपल्यावर दादागिरी केली असती. जर मोदी नसते तर राम मंदिर निर्माण झालं नसतं. हिंदूंच्या आस्था पायदळी तुडवल्या गेल्या असत्या. जर मोदी नसते तर वक्फ बिल सुधारणा कायदा आलाच नसता. हिंदू आणि मुसलमान दोघांनाही फसवून वक्फने जमिनी घशात घातल्या असत्या. ही यादी मोठी आहे. मी फक्त वरवर दिसणारे मुद्दे इथे मांडलेत. अंतर्गत, सूक्ष्मात आणखी बदल घडलेले आहेत. नरेंद्र मोदी हे भारताला पडलेलं सुंदर स्वप्न आहे.

विशेष म्हणजे नरेंद्र मोदींची जडणघडण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून झालेली आहे. संघ स्वयंसेवक ते भाजपा कार्यकर्ते व पुढे मुख्यमंत्री आणि आता पंतप्रधान असा त्यांचा चित्तवेधक प्रवास आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही केवळ एक संघटना नसून तो एक विचार आहे. या विचारावर आणिबाणी लादली गेली, बंदी घालण्यात आली. मात्र फॅसिस्ट लोकांना संघाचा आवाज दाबता आला नाही. उलट हा आवाज आता गर्जना झालेली आहे. डॉ. हेडगेवार यांनी शंभर वर्षांपूर्वी हिंदुत्वाच्या विचारांचं बीजारोपण केलं. आता या विचारांचा वटवृक्ष झालेला आहे. नरेंद्र मोदी याच विचारप्रवाहातून निर्माण झालेले आहेत.



२०२५ च्या विजयादशमीला संघ १०० वर्षांचा होणार आहे. संघाच्या हिंदुत्व या विचारासोबत संघाचं सेवाकार्यही महान आहे. सर्व समाजाचा सर्वांगीण विकास हे संघाचं ध्येय आहे. मदतकार्य राबवताना संघ जात-धर्म बघत नाही. मोदींनी देखील आपलं राजकारण याच सूत्राने केलेलं आहे. हिंदुत्वाचा पाया भक्कम ठेवत सबका साथ सबका विकास ते साधत आहेत. या सर्व गोष्टींची आठवण होण्याचं कारण म्हणजे उबाठा गटाचे सकाळचे प्रवक्ते संजय राऊत यांनी ''भारतीय जनता पक्षाला आणि देवेंद्र फडणवीसांना मिशा फुटल्या नव्हत्या तेव्हापासून आम्ही हिंदुत्वाच्या मिशीला पीळ देत आहोत. त्यामुळे त्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये.'' असं विधान केलं आहे. गंमत म्हणजे उबाठा गटाने वक्फ सुधारणा विधेयकाच्या विरुद्ध मतदान केले आहे. अरविंद सावंत तर हिरवे कपडे घालून आले होते. उबाठा गट इतका गोंधळलेला आहे की त्यांना या विधेयकाला विरोध करायचा की सहकार्य करायचं हेच कळत नव्हतं. उद्धव ठाकरेंची पत्रकार परिषद देखील गोंधळलेली होती. त्यांना नेमकं काय म्हणायचं होतं हेच कळत नव्हतं. ''आज वक्फ बोर्डावर नियंत्रण आणताय. ठीक आहे. त्याचं स्वागत पण ज्या पद्धतीने भाजपची पावलं पडताहेत... उद्या तुम्ही हिंदूंवर पण आणाल, आधीच देवस्थानांची जागा हडपली गेली आहे... हिंदुत्वाचे राखणदार आहात तर मुसलमानांची इतकी बाजू घेताहात... हिंदूंमध्ये गरीब नाही का.. मुस्लिम गरिबांना काय फायदा होणार आहे? तुम्ही मुसलमानांचे लांगूलचालन करत असताना आम्ही त्याला विरोध करत असू तर हिंदुत्व आम्ही सोडलं की तुम्ही? भाजपचे आभार मानेन... वक्फ बोर्डाचा विषय घेतला त्यामुळे भाजपचं खरं रूप काय हे कळालं.'' या सगळ्या बोलण्याला कोणताच आधार, आगा-पीछा नसल्यामुळे हे सबंध बोलणं वायफळ ठरलं आहे.

उद्धव ठाकरे आणि त्यांचा सबंध उबाठा गट इतका गोंधळलेला आहे की नेमकी भूमिका काय घ्यायची हे त्यांना कळत नाही. ज्याप्रमाणे अजय देवगण चित्रपटांत दोन बाईक्सवर पाय ठेवून हिरोगिरी दाखवतो त्याप्रमाणे हे दोन दगडांवर पाय ठेवून उभे आहेत. पण त्यांचा सारखा सारखा तोल जातोय. तरी आपण ठामपणे उभं असल्याचा अभिनय ते करत आहेत. गोंधळलेलं राजकारण, त्यात दिशा आणि सुशांतच्या प्रकरणात त्यांचा पाय खूप खोलात जात आहे. हायकमांडने नुसतं मनात आणलं तरी गंभीर परिणाम दिसू शकतात. एवढे असून देखील त्यांचा बाणा कमी झालेला नाही. एकनाथ शिंदेंसोबतच्या बैठकीत आदित्य ठाकरे उभे राहिले नाहीत आणि शिंदेंकडे ज्या पद्धतीत रोखून पाहत होते, त्याला काय म्हणायचं? राजकारण करताना डोक्यावर बर्फ ठेवायचा असतो. याची जाणीव या ठाकरे पिता-पुत्रांना कधीच झाली नाही. आज राजकीयदृष्ट्या त्यांची परिस्थिती फार चांगली नाही. पण तरीही त्यांना ही जाणीव होत नाही.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांची पुण्याई किती दिवस कामी येईल? त्यालाही मर्यादा आहेत ना! वर आपणच हिंदुत्ववादी असल्याचा आव आणत आहेत. म्हणूनच मी वर मोदी आणि संघाचं उदाहरण दिलं आहे. नितेश राणे यांनी त्यांच्या शैलीत राऊतांना उत्तर दिलेलं आहे. फडणवीसांनी तर ''कोण आहे राऊत?'' म्हणत त्यांना झटकून टाकलं. परंतु राऊत आपण खूप मोठे नेते आहोत अशा थाटात वावरत आहेत. त्यांची भाषा महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणारी नाही. ते हिंदुत्वाच्या मिशांना पीळ देण्याच्या गोष्टी करतात. परंतु त्यांच्या मिशा कधी हिरव्या तर कधी पिंगळ्या भासतात, ज्यास ते भगवा म्हणतात. बोलाचा भात आणि बोलाची कढी हे हिंदुत्व नाही. हिंदुत्व कृतीत आहे. ती कृती मोदी करत आहेत. त्याची बीजे संघाने पेरलेली आहेत. ही प्रेरणा छत्रपतींकडून घेतलेली आहे. राऊतांना हिंदुत्वाच्या मिशा बघायच्याच असतील तर मोदींच्या मिशा बघता येतील. नागपुरातही त्यांना हिंदुत्वाच्या मिशा पाहता येतील. हे अगदीच शक्य नसेल तर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांच्या मिशा पाहता येतील. हिंदुत्वाच्या मिशा अशा असतात मिस्टर राऊत. पराक्रमी, शूर, महिलांचा आदर करणाऱ्या, सभ्य आणि सज्जन! नव्हे बोलबच्चन!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# दयाभाव जागृत अभियान काळाची गरज!

माणसे जन्माला येतात, परंतु माणुसकी निर्माण करावी लागते. आज आपण कलियुगात वावरत आहोत. यामुळे प्रत्येकाकडून चांगल्या गोष्टींची अपेक्षा करणे व्यर्थ असल्याचा समज बहुतांश लोकांचा झाला आहे. ती बाब काही प्रमाणात सत्य असली तरी माझ्या मते प्रत्येकाच्या मनातील सुप्तावस्थेत दयाभाव असतो. निसर्गाने मानवी मेंदू तयार करताना त्यात दयाभाव अंतर्भूत केलेला आहे. फक्त त्या दयाभावाला जागृत करण्याची गरज असते. आता तीच गरज लक्षात घेता त्यानुसार दयाभाव जागृत अभियान देशपातळीवर सुरू करण्याची गरज आहे. 'चंद्र तिथे चंद्रिका, संत तिथे विवेका असणे किजे' त्यानुसार प्रत्येक माणसाकडून माणुसकी अपेक्षित मानली जाते. पण प्रत्यक्षात तसे चित्र दिसत नाही. याची अनेक कारणे असली तरी त्यावर उपाय योजण्याची गरज आहे. वस्तुतः माणूस असेल जिथे, माणुसकी असावी तिथे हा फॉर्म्युला प्रत्येकाच्या संदर्भात लागू पडायलाच हवा. नव्हे तशीच शिकवण, तसेच शिक्षण, तसेच वातावरण संपूर्ण देशात तयार व्हायला हवे. ज्याचा जन्म झाला, त्याचा मृत्यू अटळ आहे. मग जन्म आणि मृत्यूच्या मधल्या काळात माणूस म्हणून जन्माला आलेली व्यक्ती एवढी अहंकारी, क्रूर, दयाभाव न दाखविता का जगते, याचे उत्तर शोधावे लागेल किंवा साम, दाम, दंड आणि भेद वापरून दयाभाव मनामनावर बिंबवावा लागेल. अपघात झाल्यानंतर जखमींना सोडून पळणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. पैशासाठी भावाचा,पित्याचा खून करणाऱ्या घटनाही वाढल्या आहेत. गरज नसतानाही हिस्सा हवा म्हणून बहिणी थेट भावांच्या विरोधात कोर्टात जात आहेत. चिमुकल्या मुलीवर निस्सीम प्रेम करायचे सोडून तिच्यावर अत्याचार करणारेही वाढले आहेत. एखाद्याने आपले दु:ख सांगितले तर त्यावर मलम लावण्याऐवजी मीठ चोळणारेच वाढले आहेत. एवढी निष्ठुरता मानवात आलीच कशी? देवाने माणसाला तयार करताना असा विचारच केलेला नव्हता. तरीही माणसाने सरड्याप्रमाणे रंग बदलण्याचे कसब आत्मसात केले अन् सुरू झाला कलियुगातील दयाभाव संपविण्याचा प्रकार. सामान्य जीवन जगताना केवळ स्वत:चा विचार माणसाकरिता कर्दनकाळ ठरला आहे. आपल्यामुळे इतरांना त्रास होईल याचीही तमा बाळगली जात नाही. पूर्वी तहानेने व्याकुळ माणसाला पाणी पाजा अशी शिकवण दिली जायची. नव्हे आई वडील तशी कृती मुलामुलींकडून करून घ्यायचे. तसे पाहता परोपकार हाच आपल्या संस्कृतीचा मजबूत पाया मानला जातो. म्हणूनच आपण वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना जगाला दिली. हीच आपली संस्कृती आहे. भूक लागली असताना खाणे म्हणजे प्रकृती. भूक लागली नसताना खाणे म्हणजे विकृती. भूक लागली असताना दुसऱ्यांना देत खाणे म्हणजे संस्कृती होय. आता आपल्याला प्रकृती, विकृती आणि संस्कृती यातील भेद समजून संस्कृती जपावीच लागेल. एक सांगतो, रिकाम्या भांड्यावर झाकण आणि चुकीच्या विचारांची पाठराखण काही उपयोगाची नसते. दगड एकदाच मंदिरात जातो अन् भगवंत होतो. माणूस मात्र वारंवार मंदिरात जातो पण दगडच राहतो. आपल्याला पाषाणाप्रमाणे कठोर राहायचे की, सहृदयी होऊन पृथ्वीवरील आपल्या जन्माचे सार्थक लावायचे याचा विचार आजच करावा लागेल. अहो, या जगात

''बेईमानी से पैसे कमाने वाले भी, इमानदार चौकीदार ढूंढते है।'' याचा अर्थ सर्वांनाच प्रामाणिकपणा, दयाभाव हवा आहे. पण तो स्वत:पासून सुरू करावा हे धारिष्ट्य करण्याचे सामर्थ्य १०० पैकी ९९ लोकांजवळ नाही. हेच धारिष्ट्य करणाऱ्यांची संख्या वाढावी याकरिता दयाभाव जागृत अभियान घराघरात सुरू व्हायला हवा. याकरिता लहान मुलांना नर्सरीपासून दयाभाव कसा लाभदायक असतो, हे पटवून द्यावे लागेल. शेवटी, नका देवाते विसरू, नका देशाते विसरू । कष्ट सोसा देशासाठी, काही जोडा पुण्यगाठी।। हे सेनापती बापट यांचे वाक्यही मुलांच्या मनात रुजवावे लागेल. ओल्या मातीला सहजतेने आकार देता येतो, अगदी तोच मूलमंत्र जपत मुला-मुलींना गर्भसंस्कारापासून दयाभाव सांगावा लागेल. कोरोना काळात गरजवंत देशांना मोफत लस वाटून भारत सरकारचा दयाभाव जगाने अनुभवला. परिणामी 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो' याचीही प्रचीती आता हळूहळू भारतीयांना येऊ लागली आहे. हा सर्व चमत्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखविलेल्या दयाभाव वृत्तीमुळे घडला, हे नाकारता येणार आहे का? मग हीच दयाभावाची वृत्ती वृद्धिंगत करण्यासाठी भेद सारे मावळू द्या, वैर साऱ्या भावना । मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना।। मुक्त आम्ही फक्त मानू बंधतेच्या बंधना।। सत्य-सुंदर-मंगलाची नित्य ही आराधना।।

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# ताकाला जाऊन भांडं कशाला लपवता?

भाजपा मुस्लिमांचे लांगूलचालन करत आहे. हे वक्फ बिलावरून स्पष्ट झाले आहे. बिलात काही चांगल्या गोष्टी आहेत. त्यामुळे आमचा बिलाला विरोध नाही. तर, भाजपाच्या ढोंगाला आमचा विरोध असल्याची भूमिका उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी विशेष पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केली. अर्थात त्यांना ती करावी लागली, त्यांचा नाईलाज होता. ठाकरेंनी केलेला हा प्रकार म्हणजे शुद्ध सोयीस्कर अशी पळवाट असल्याचे अबोध बालकदेखील सांगेल. धरले की चावते आणि सोडले की पळते, अशा अवस्थेतून जाण्यापेक्षा ठाकरेंनी जर मुस्लिमांची साथ घेतली आणि बाजू घेतलीच आहेत तर, ती छातीठोकपणे, उघडपणे घ्यावी ना... 'ताकाला जाऊन भांडं कशाला लपवायचं?'

खुर्चीच्या मोहापोटी भाजपासोबतची युती तोडली. याबद्दल सामान्य मराठी माणूस, हिंदू समाजाची तुमच्याबद्दल कधीही फार अशी विशेष तक्रार नव्हती. तुम्ही मुंबई महापालिकेत ३० वर्षे राज्य करून मुंबई लुटली, स्वत:ची दोन आलिशान घरं बांधली, विदेशात आणखी काय काय केले तो भाग सोडाच, मात्र, मराठी माणसाला मुंबई बाहेर हुसकावून लावलं. पण सामान्य मराठी माणूस, मुंबईकर किंवा हिंदू समाजाने कधीही आक्षेप तुमच्यावर घेतल्याचे ऐकिवात नाही. कदाचित यामुळेच की काय तुमची हिंमत वाढली असावी. मग तुमची मजल एका उच्चशिक्षित डॉक्टर महिलेला, प्रसिद्ध अभिनेत्रीला, विद्यमान महिला खासदाराला अश्लील शिवीगाळ करण्यापर्यंत गेली. कोणीतरी समाज माध्यमावर व्यक्त झालं, कोणाची तरी पोस्ट कोणीतरी शेअर केली म्हणून, मग ती महिला, पुरुष, मराठी माणूस, नेव्ही ऑफिसर, मराठी अभिनेत्री, मराठी विद्यार्थी, मराठी पत्रकार कोणीही असू द्यात, अशा कोणाचीही हयगय न करता, कोणाला तुरुंगात डांबले तर, कोणाला भर रस्त्यावर मारहाण करण्यात आली आणि एकाला तर, थेट मंत्र्यांच्या बंगल्यावर नेऊन बेदम मारहाण करण्यात आली.

आम्ही हिंदुत्व सोडलं नाही म्हणाऱ्यांच्या सत्ताकाळात हनुमान चालिसा म्हणतो म्हणणाऱ्यांना अडविण्यात आले. नव्हे तर, थेट देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तुरुंगात डांबण्यात आले. 'सर तन से जुदा'चा नारा देत एका विशिष्ट समुदायाने अत्यंत क्रूरपणे हत्या केल्या, त्याला पोलिसांवर दबाव टाकून, दरोड्याचा मुलामा चढवत हिंदूवर होत असलेल्या धार्मिक अत्याचाराच्या घटनेला दाबण्याचा प्रयत्न केला.




कोट्यवधीची खंडणी गोळा करून घर भरणाऱ्या पोलिसाने एका निरपराध व्यक्तीची हत्या करूनदेखील त्याला पाठीशी घालण्याचे काम यांच्या सत्ताकाळात झाले. साधुसंताच्या हत्या होऊ लागल्या आणि त्यावर पांघरूण घालण्याचं पाप देखील हिंदुत्व न सोडलेल्या ठाकरेंच्याच काळात झाले. मतांसाठी मुस्लिमांचे लांगूलचालन करणं, लाचारी पत्करणं कमी पडले म्हणून की काय? निवडणुकांमध्ये ठाकरेंच्या उमेदवाराच्या प्रचार रॅलीमध्ये पाकिस्तानी झेंडे फडकविण्यात आले, मुंबईकरांच्या रक्ताने हात माखले असणाऱ्या साखळी बॉम्बस्फोटाचा आरोपी यांच्या उमेदवाराच्या प्रचार रॅलीत मते मागताना दिसला. तेव्हा मात्र, उद्धवसाहेब तुमची नियत आणि नीती दोन्ही उघडे पडले. जय श्रीरामच्या उच्चाराला हरामखोरपणा म्हणणे, जय श्रीराम म्हणणे म्हणजे उन्माद करणे असे म्हणण्यापर्यंत उद्धवसाहेब तुमची मजल गेली. अशा घटना घडत गेल्यामुळे आता खऱ्या अर्थाने महिला, मराठी आणि हिंदू समाजाचे डोळे उघडले आहे. त्यामुळे कोण ढोंगी आणि कोण सोंगी हे तुम्ही सांगण्याच्या भानगडीत न पडलेलंच बरं, उद्धवसाहेब.

मी हिंदुत्व सोडल्याचं एक उदाहरण मला दाखवून द्या. मी घरी जाऊन बसेन. पुन्हा कधी तुम्हाला तोंड दाखवणार नाही. असं, एका जाहीर सभेत मोठ्या आवेशात उद्धवसाहेबांनी आव्हान दिलं होतं. यावेळी दिलेली वरील सगळी उदाहरणं बघता, ठाकरेंना खरंच तोंड दाखवायला जागा नाही, हे सिद्ध होते. मात्र, काय करणार, शब्द देऊन न पाळणं, वचनं मोडणं हा मूळ स्वभाव असलेले साहेब पुन्हा पुन्हा तोंड दाखवतच आहेत. आणि एवढ्यावर थांबलेत का साहेब? तर, वक्फ विधेयकाच्या विरोधात मतदान करून, स्वतः मुस्लिमांचे लांगूलचालन करून, उलट भाजपावर आरोप करताना दिसत आहेत. इतका निर्लज्जपणा नेमका आणतात कुठून हे लोक याचं आश्चर्य वाटते.

हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करून ध्रुवीकरणाचे राजकारण करत असल्याचा आरोप उबाठा गटाकडून भाजपावर केला जातो. भाजपा हिंदुत्ववादी राजकरण करत मुस्लिमांवर अन्याय करत असल्याचा आरोप साहेब करतात. दुसरीकडे वक्फ विधेयक आणून भाजपा मुस्लिमांचे लांगूलचालन करीत असल्याचा आरोपदेखील साहेब करीत आहेत. 'अरे कहना क्या चाहते हो' वाला किस्सा इथे निर्माण झाला आहे. वक्फ विधेयक जर खरंच लांगूलचालनासाठी मुस्लिमांच्या हिताचे असेल तर, मग तुम्ही त्याचं समर्थन का केलं नाही? तुम्ही मुस्लिम विरोधी आहात का? आणि हे विधेयक मुस्लिमांशी संबंधित आहे हे स्पष्ट असताना, हिंदूंचा दूरान्वयानेही संबंध नसताना, ''या विधेयकाचा आणि हिंदुत्वाचा काहीच संबंध नाही.'' असे विधान करण्यामागे आपला काय हेतू होता उद्धवसाहेब? तुम्हाला बोलयाचेच होते तर, मुस्लिम समाज आणि वक्फ विधेयकावर बोलले असते. पण त्यात हिंदूंचा संबधंच नाही, मुस्लिमांचं लांगूलचालन केलं आहे. त्यामुळे आता हिंदूंचे डोळे उघडले आहेत. हिंदू आता जागा झाला आहे. त्यामुळे आता उद्या कुठे जरी निवडणूक झाली तरी भाजपला जडच जाईल, हे विधान कोणी केलं? वक्फ बिल आणि हिंदूंचा संबंध, हिंदू जागा होणं, डोळे उघडणं ही सगळी विधाने उद्धव ठाकरेंसाहेब आपण काय सामाजिक सलोखा जोपासण्यासाठी केलेत? चार पत्रकारांसमोर डिंगा हाकल्यानं सत्य लपत नसते. जनता दुधखुळी नाही. तुम्ही जर मुस्लिमांची साथ देण्याचा आणि घेण्याचा निर्णय घेतला असाल तर, छातीठोक उघडपणे बोला. भाजपाच्या नावाने शिमगा करून तुमचा फायदा होईल अशी परिस्थिती आता राहिली नाही. कारण तुमचं ढोंगी हिंदुत्व आणि धर्मनिरपेक्षता दोन्हीचं पितळ उघडं पडलं आहे. ''ताकाला जाऊन भांडं लपवलं'' आणि ''डोळे मिटून दूध पिलं...'' काहीही केलंत तरी, ''जो बूंद से गई वो हौद से नहीं आती'', हेच वास्तव आहे.

९२७०३३३८८६

## रामराज्य आणि हिंदुराष्ट्र

श्रीराम हा शब्द भारतीयांच्या जवळचा शब्द, अनेकांचे जीवन या एका नामाने घडवले. त्याचे राज्य म्हणजे 'रामराज्य', ते आजही 'परिपूर्ण आदर्श राज्य' मानले जाते. जेथे 'एकमेकां साहाय्य करू' अशा व्यवहाराचे सर्वच्या सर्व लोक असतात, जिथे प्रत्येकजण कर्तव्यपालन म्हणजेच धर्मपालन समजतो. जसे की वृद्ध माता पित्याची प्रेमाने काळजी घेणे म्हणजे पुत्र धर्माचे पालन, असे दैनंदिन जीवनात विविध प्रकारचे धर्मपालन आपण करीत असतो. अशी आपापली कर्तव्ये चोख पार पाडणारी जनता जिथे असते त्याला 'रामराज्य' म्हणतात. प्रभू श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम होते.



प्रजा म्हणजे केवळ मनुष्य नाही, तर त्यात पशू, पक्षी, जीव, जंतू, वृक्ष, भूमी, वनसंपदा आणि भूमी यांचा समावेश आहे अन् या प्रजेचे दायित्व घेऊन रक्षण करणे, संवर्धन करणे आणि त्याची देखभाल करणे, हे राजाचे कर्तव्य आहे. हे करत असताना राजा त्याचे हित पाहात नाही. जो राजा स्वहितापेक्षा त्याचा राजधर्म कशात आहे आणि त्याला काय करायचे आहे, एवढेच पाहतो, जो स्वतः धर्माचरण करतो आणि इतरांकडून करवून घेतो तोच आदर्श राजा, जसे प्रभू श्रीराम. स्वातंत्र्य नंतरच्या काळात भारतात पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करणे वाढत गेले. तसेच हिंदूंना धर्माचे शिक्षण न मिळाल्यामुळे ते धर्माचरणापासून दूर गेले. याचे परिणाम म्हणजे नैतिक अध:पतन होत गेले. यामुळे आज आपल्या राष्ट्रासमोर अनेक आव्हाने, समस्या आहेत. या सर्वांवर एकमेव उपाय आणि तो म्हणजे धर्माधिष्ठित राज्य म्हणजे रामराज्य होय! अखिल मानवजातीच्या हितासाठी हिंदू धर्माधिष्ठित राज्यप्रणालीच हवी!

**वर्षा आवदे**/नागपूर

●● ●●

## बाप रे! अल्पसंख्यकांचा एवढा पुळका?

नुकतीच संसदेच्या दोन्ही सभागृहांत वक्फ बोर्ड विधेयकावर वादळी चर्चा झाली. संख्याबळ तसे तर रालोआ व भाजपा सरकारजवळ सहज होते. कोणतीही चर्चा न करता

## वाचक पत्रे

ते विधेयक सरळ राष्ट्रपतींकडे जाऊ शकले असते. परंतु सुरुवातीला जेपीसीकडे सोपवून प्रत्येक पक्षातील विचारवंत त्यात घेतले. देशभरातील सुमारे एक कोटीच्या वरील लोकांकडून अभिप्राय मागवला.

मुस्लिम धर्मगुरू, नेते, जनता यांच्याशी संवाद साधला तेव्हा कुठे समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी याचा अहवाल केंद्राकडे सोपवला. इतके सगळे झाल्यावर शेवटी चर्चा आठ तास नको बारा तास हवी असे विरोधकांनी म्हटले व ते आपोआपच मान्यही झाले. एरव्ही 'आम्हाला बोलू देत नाही' अशी ओरड करणारे काँग्रेसचे युवराज राहुलबाबा यांना तर छान संधी होती बोलण्याची कारण विरोधी पक्षनेता आहेत म्हणून. पण अभ्यासच नसल्यामुळे हा विषय मग दुसऱ्या वक्त्याकडे सोपविण्यात आला.

राहुल फक्त 'चीनने आमचा भूभाग बळकावला व हे संविधानाचे पुस्तक' बस्स इतकेच बोलू शकतात हे दिसून आले. आता विरोधी पक्ष तो विरोधीच. त्यांच्याकडून दुसरी अपेक्षाच काय करणार? परंतु वक्फ कायदा अस्तित्वात आल्यापासून अनेकदा त्यात बदल होत गेले व ते सुद्धा काँग्रेसच्या काळात. आज पंचेवीस कोटींच्या घरात हे 'अल्पसंख्यक?' आहेत. मग जैन, पारसी, बौद्ध, ख्रिश्चन यांना बहुसंख्यक म्हणावे का? चर्चेच्या निमित्ताने का होईना विरोधी पक्षनेत्यांचे व्यक्तिगत मतही लोकांना कळून गेले. लालूप्रसाद, मुलायमसिंह पुत्र अखिलेश यादव, ममता बॅनर्जी, बरे यांचे तर जाऊ द्या पण आपले उद्धवरावांचे प्रवक्ता संजय राऊत यांचे भाषण खुमासदार झाले. असदुद्दीन ओवैसी यांच्याबद्दल काय बोलावे ? अजूनही ते पूर्णपणे अल्पसंख्यक नेता झालेच नाही. तेव्हा आपण आपला गड मजबूत केला पाहिजे व फाळणीच्या चुकांना वारंवार आठवत या लोकांना वेळोवेळी धडा शिकवला पाहिजे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

●● ●●

## विकृत विनोदांवर नियंत्रण हवे!

विनोदाशिवाय जीवनाची कल्पना करणे अशक्य आहे. विनोद म्हणजे जीवनाची ऊर्जा! विनोदामुळे मन हलके होते आणि मनावरील तणाव दूर होतो. विनोदी लेखक पु. ल. देशपांडे, आचार्य प्र. के. अत्रे यांच्या विनोदी लेखनाचा आनंद तर बहुतेकांनी घेतलाच आहे. प्रसिद्ध वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या चारोळ्यांनी निखळ मनोरंजन व्हायचे. मात्र, आज मनोरंजनाच्या नावाखाली अश्लील विनोद करणे रूढ होत आहे. 'स्टॅण्डअप कॉमेडियन' नावाचे विनोदाचे नवीन फॅड आज सर्वत्र पसरले आहे. त्यातील विनोद अत्यंत खालच्या स्तराचे असतात.

नुकत्याच एका कार्यक्रमात रणवीर अलाहाबादिया याने आई-वडिलांविषयी अश्लील विनोद केले होते. अगदी ताजे उदाहरण बघायचे झाले तर स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामराने केलेल्या अवमानकारक कवितेचा विषय काही दिवसांपासून गाजत आहे. त्याने तर थेट महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच लक्ष्य केले आहे. अपमान करणारे विनोद, अश्लील विनोद यावर नियंत्रण ठेवणार कोण? की अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली असेच सुरू राहणार? असा प्रश्न मनात येतो.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हा प्रशासनाने लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवूनच विकास कामे करावीत -राज्यमंत्री योगेश कदम

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राज्य शासन जिल्हा प्रशासनातील विविध विभागामार्फत जिल्ह्यातील विविध विकास कामे पार पाडत असते. जिल्ह्यातील विकास कामे करतांना जिल्हा प्रशासनातील विभागानी आपल्या लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवूनच विकास कामे करावीत अशा सूचना राज्याचे गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिल्या.




जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित आढावा बैठकीत राज्यमंत्री श्री. कदम हे बोलत होते. यावेळी आमदार अर्जून खोतकर, आमदार हिकमत उढाण, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदिश मिणियार, पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खेडकर, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपणी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

अन्न औषध प्रशासन विभागाचे कामाकाज अपेक्षेप्रमाणे होत नसल्याची नाराजी व्यक्त करुन, यावेळी श्री. कदम म्हणाले की, बांधकाम कामगार मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत जिल्ह्यातील कामगारांना दोन वेळचे जेवण मोफत उपलब्ध करून दिले जाते, ते कामगारांना वेळेवर मिळते का ? तसेच त्या भोजनातील अन्नाचे परिक्षण किंवा तपासणी करण्यात येते का ? जिल्ह्यातील औषध विक्रीच्या दूकानावरुन नशेच्या गोळ्यांची विक्री होत असून, यामुळे तरुण युवक नशेच्या आहारी पडत आहे. याबाबत संबंधीत औषध विक्रेत्यांवर अन्न औषध प्रशासन विभागाने काय कारवाई केली ? तसेच दूध भेसळ करणाऱ्यावर किती कारवाई करण्यात आल्या ? तसेच अन् औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईचा सविस्तर तपशिल सादर करण्याचे निर्देश श्री. कदम यांनी संबंधीताना यावेळी दिले. तसेच उमेद अंतर्गत महिला बचत गटांनी पारंपारिक उद्योग सोडून, नाविन्यपूर्ण उद्योग सुरु करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच महिला बचत गटासाठी मॉलचे प्रस्ताव तयार करुन, तात्काळ शासनाकडे सादर करुन त्यासाठी पाठपुरवठा करावा. तसेच जिल्ह्यातील ज्या ग्राम पंचायती मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पुढील ३० वर्ष पाण्याचे नियोजन करुन १०० टक्के कामे झाली आहेत, अशा ग्राम पंचायतीनी ठराव दिले आहेत का ? काम पूर्ण झालेल्या ग्राम पंचायतींना आता टँकरची आवश्यकता पडू नये, अन्यथा या सर्व कामांची चौकशी करण्यात येईल. तसेच ज्या ग्राम पंचायतीच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, त्या संबंधीत कंत्राटदारांवर कारवाई करुन त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे का ? अशी विचारणा करुन, जी कामे अपूर्ण आहेत, ती लवकरात लवकर पूर्ण करावीत. तसेच जिल्ह्यात होणारी विकास कामे, योजना, प्रकल्पांची माहिती लोकप्रतिनिधींना वेळोवेळी उपलब्ध करून द्यावीत. तसेच सदर कामे लोकप्रतिनीधींना विश्वासात घेवूनच करावीत, अशा सूचना ही श्री. कदम यांनी यावेळी दिल्या.

जिल्हा पुरवठा विभागाने त्यांना प्राप्त झालेल्या इष्टांक नुसार, नवीन नांवे समाविष्ट करण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे. तसेच जिल्ह्यात आयपीएल सामान्यावर सट्टा लावण्याचे प्रकार वाढत असुन याद्वारे गुन्ह्याचे प्रमाण वाढत आहेत, याकरीता पोलीसांनी जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था अबाधीत राहवी याकरीता संबंधीताचा शोध घेवून कठोर कारवाई करावी. तसेच सर्व विभागांनी मुख्यमंत्री यांचा शंभर दिवस कार्यक्रम यशस्वीपणे राबवावा. ई-पीक पाहणी आणि ग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणीसाठी विशेष शिबीरांचे आयोजन करावेत. संपुर्ण जिल्हा परिषदेत १०० टक्के ई-ऑफीस प्रक्रिया राबविण्याचे निर्देश श्री. कदम यांनी यावेळी दिले.

यावेळी श्री कदम यांनी जिल्हा परिषद, अन्न औषध प्रशासन विभाग, पुरवठा विभाग, कायदा सुव्यवस्था आदी विभागाचा आढावा घेतला. आमदार अर्जून खोतकर आणि आमदार हिकमत उढाण यांनी देखील यावेळी विविध विभागाकडून जिल्ह्यातील पाणी पुरवठा, कायदा सुव्यवस्था आदींचा आढावा संबंधीतांकडून घेतला.

यावेळी आढावा बैठकीस जिल्हा प्रशासनातील विविध विभाग प्रमुखाची उपस्थिती होती.

## संक्षिप्त

# झन्ना मन्ना जुगार अड्ड्यावर पोलीसांचा छापा!

## जुगार खेळणाऱ्या पाच पैकी तिघांना पकडले, दोघांना सोडले?

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जुगारा संदर्भात आ.अर्जुनराव खोतकरांनी अधिवेशनात मुद्दा उपस्थित केल्यानंतर पोलीस प्रशासन जागे झाले असुन तोंड पाहुन छोट्या मोठ्या कारवाया करत आहे.दरम्यान मंगलवारी सदर बाजार पोलीसांनी हॉटेल आदिती येथे चौथ्या मजल्यावर चालणार्या जुगार अड्ड्यावर छापा मारुन पाच पैकी तीन जुगार्यावर कारवाई करुन दोन धनाढ्या जुगार्यांना सोडुन दिल्याने सदर बाजार पोलीसांच्या या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्या जात आहे.विशेष म्हणजे या कारवाई दोन सहायक पोलीस निरिक्षक सहभागी होते.

मंगळवारी रात्रीच्या सुमारास जिजामाता प्रवेशद्वारा जवळील आदिती हॉटेल मध्ये काही प्रतिष्ठीत व्यक्ती जुगार खेळत असल्याची माहीती सदर बाजार पोलीसांना लागली होती,त्यामुळे सदर बाजार पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक साबळे,सहायक पोलीस निरिक्षक निता गायकवाड या दोघांना टिम घेवुन हॉटेल आदीतीवर रेड मारली,हॉटेलच्या चौथ्या मजल्यावरील रूम क्रमांक ३०५ मध्ये स्वतःच्या व इतरांच्या आर्थिक फायद्यासाठी पाच जण जुगार खेळतांना आढळुन आले,पोलीसांनी त्यातील तिघांना ताब्यात घेतले तर त्यातील धनाढ्य असलेल्या जुगार्यांना मोकळा रस्ता करुन दिल्याची विश्वसनीय माहीती समोर आली आहे. सदर बाजार पोलिसांनी या ठिकाणाहुन ४१ हजार ५०० रुपयाची रोख व ४ मोबाईल जप्त करुन तिघांवर कारवाई केली,माञ हे तिघे कोण याचा उलगडा सदर बाजार पोलीसांनी न केल्याने या कारवाईतील सहभागी पोलीस अधिकार्यावर संशय निर्माण होत आहे. मंगळवारी झालेल्या कारवाईचे सीसीटिव्ही फुटेज मागवुन पाच जुगार्या पळुन गेलेले की पळवुन लावलेले ते दोन धनाढ्य जुगारी कोण याची चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

# जिल्हाध्यक्ष राजेश पवार यांना सेवारत्न पुरस्कार जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील सोमनाथ येथील मा.सरपंच व राष्ट्रीय बंजारा परिषदेचे जालना जिल्हाध्यक्ष राजेश पवार यांना यावर्षीचा सेवारत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.यासंदर्भात अधिक माहिती अशी की गत एका वर्षात राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या माध्यमातून त्यांना महंत जितेंद्र महाराज,धर्मनेते किसनराव राठोड,राष्ट्रीय अध्यक्ष विलासराव राठोड,प्रदेशाध्यक्ष भिकनराव जाधव,महासचिव पंडितराव राठोड,प्रदेशसचिव उमेशराव राठोड,प्रदेश उपाध्यक्ष अमोल पवार यांच्या नेतृत्वात केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या वतीने त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.बंजारा समाजाची काशी पोहरागड, उमरी येथे संत सेवालाल महाराज यात्रा महोत्सवात रविवार दि.०६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत राजेश पवार यांना सेवारत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.पुरस्कार मिळाल्याबद्दल राजेश पवार यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# विषमतावादी व्यवस्था उलथून टाकण्यासाठीच आझाद क्रांती सेनेत दाखल झालो-दगडू घोडे



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर येथील विश्रामग्रहावरती सेना प्रमुख आझाद क्रांती सेना राजेश घोडे यांच्या हस्ते दगडू घोडे (मामा) यांची आझाद क्रांती सेनेच्या जिल्हा प्रमुख पदी निवड म्हणून घोषणा करण्यात आली आझाद भारतातील सामाजिक, आर्थिक, व राजकीय, गुलामांना आझाद करण्यासाठी आझाद क्रांती सेना हे काम करत आहे या देशातील जुलमी व विषमतावादी व्यवस्था उलथून टाकण्यासाठी जिल्हाप्रमुख दगडू घोडे (मामा) यांनी जिल्हा तालुका व गाव अशी बांधणी करून संघटन मजबूत करावं असं मत या प्रसंगी सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले यावेळी दगडू घोडे (मामा) यांचे अभिनंदन अशोक साबळे, इंद्रजीत हिवाळे, अशोक पुरुळे, विलास लोखंडे, प्रकाश लोखंडे, ज्ञानेश्वर साळवे,अजय इंगळे यांनी केले

# शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत विनामुल्य नोंदणी करुन घ्यावी -उपविभागीय अधिकारी डॉ.श्रीमंत हारकर

**जालना । प्रतिनिधी**

राज्यातील कृषि क्षेत्रात डिजीटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतक-यांना देणे सुलभ व्हावे याकरिता शासनाची ॲग्रीस्टॅक योजना राज्यभरात सुरु झाली आहे. या योजने अंतर्गत शेतक-यांनी नोंदणी केल्यानंतर शेतकरी ओळख क्रमांक तयार होऊन त्याआधारे शेतक-यांना खालील विविध योजनांचा लाभ जलद गतीने होणार आहे. यामध्ये शेतक-यांना स्वस्त कर्ज, उच्च गुणवत्तेची कृषि निविष्ठा, विपणन, स्थानिक आणि विशिष्ठ तज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध होणार, शेतक-यांना बाजारपेठेपर्यंत अधिक माहितीपूर्ण व सोयीस्कर प्रवेश मिळणार, पीएम किसान योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करुन लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येणार व पात्र लाभार्थी समाविष्ट करुन घेण्यास मदत मिळणार आहे. शेतक-यांना पिक कर्ज मिळविण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषि इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकास-ासाठी इतर कर्ज उपलब्ध होणार आहे. पिक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतक-यांचे देय नुकसान भरपाईसाठी शेतक-यांचे सर्वेक्षण करण्यास सुलभता येणार आहे. किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतक-यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होऊ शकणार आहे. शेतक-यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि व संलग्न विभागांना शेतक-यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच उपलब्ध आकडेवारीच्या आधारे योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येणार आहे. तसेच लाभार्थ्यांची वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही. तसेच शेतक-यांना वेळेवर कृषि विषयक सल्ले, इत्यादी बाबींचा देखील लाभ होणार आहे. जे शेतकरी ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत नोंदणी करणार नाहीत त्यांना वरील योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागेल याची नोंद घ्यावी.

तरी जालना व बदनापूर तालुक्यातील सर्व शेतक-यांनी आपल्या गावातील किंवा गाव-ाजवळील सीएससी सेंटरवर जाऊन ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत विनामुल्य नोंदणी करुन घ्यावी व शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन उपविभागीय अधिकारी डॉ. श्रीमंत हारकर यांनी केले आहे.

# दोन दिवसांपूर्वी गायब झालेल्या तरुणीचा मृतदेह आढळला



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालन्यातून दोन दिवसांपूर्वी गायब झालेल्या तरुणीचा एका विहिरीत मृतदेह आढळलाय. सीमा भगवान पाडळे (वय १९ वर्ष रा. योगेशनगर जालना) असं मयत तरुणीचे नाव आहे. सीमा पाडळे ही तरुणी आपल्या योगेशनगर भागातील राहत्या घरातून ३१ मार्च रोजी गायब झाली होती. याप्रकरणी तालुका जालना पोलिसांनी मिसिंगची नोंद करून, तिचा शोध सुरू केला होता. दरम्यान, जालना पोलीस मुख्यालयाच्या पाठीमागे असलेल्या एका विहिरीत सदर तरुणीचा मृतदेह तरंगताना आढळून आलाय. दरम्यान, पोलिसांनी अग्निशमन दलाच्या मदतीने हा मृतदेह बाहेर काढून जिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी हलविला आहे. सदर तरुणीने आत्महत्या केली की तिचा घातपात झाला..? यादृष्टीने आता पोलीस तपास करीत आहेत. दरम्यान, जालना शहरातील या धक्कादायक घटनेनं एकच खळबळ उडाली आहे.

# हरिनामाच्या व्यसनाने जीवनातील बाधा दूर -ह.भ.प.साक्षीताई अपार

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी/प्रतिनिधी**

जीवनाला नाशिवंत करणाऱ्या व्यसनांना दूर ठेवून प्रत्येकाने हरिनामाचे व्यसन अंगी करावे कारण हे व्यसन जीवनाला उध्वस्त होण्यापासून वाचविते असे प्रतिपादन भागवताचार्य साक्षीताई अपार यांनी केले. प्रभू श्री रामचंद्र जन्मोत्सवाच्या निमित्ताने येथील श्रीराम मंदिर संस्थांनच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहातील प्रथम दिवशीची कीर्तन रुपी सेवा करताना त्या बोलत होत्या.

आवडे देवासी, ऐका तो प्रकार, नामाचा उच्चार रात्रंदिन...,तुळशी माळ गळा गोपीचंद टिळा, हृदयी कनवळा वैष्णवांचा... या संत एकनाथ महाराजांच्या अभंगाची निरूपण करताना त्यांनी सांगितले की, कलियुगामध्ये नाम चिंतनाला नामस्मरणाला अविस्मरणीय महत्त्व आहे. सत्ययुग करता युगात भगवंत प्राप्ती करणे अवघड होते परंतु कलियुगामध्ये ईश्वराच्या प्राप्तीसाठी फक्त नामस्मरणाचा उल्लेख होतो. भगवंत प्राप्तीसाठी कीर्तन श्रवण व चिंतन ही भक्ती भाविकांना लाभकारक ठरते. यासाठी भगवत भक्तांनी ईश्वराच्या सानिध्यासाठी आत्मिक समाधानासाठी नामस्मरण कीर्तन व श्रवण केले पाहिजे असेही त्या म्हणाल्या. तुळशी माळ्याचे जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. गुणकारी असलेल्या तुळशीचे माळ गळ्यात परिधान केल्याने भागवत भक्तीचे पुण्य प्राप्त होते यामुळे अशा या भक्तीत तल्लीन होऊन हरिनामाचे व्यसन प्रत्येकाने अंगीकारले पाहिजे कारण या



व्यसनापासून कुठल्याही प्रकारची बाधा होत नाही तत्वतः नामस्मरणाचे व्यसन मनुष्याला विविध दुःखा पासून वाचवते यामुळे प्रत्येकाने नामस्मरण नामचिंतन केले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

आजकाल मोबाईलच्या युगात प्रत्येक जण एकाकी जीवन जगत आहे. जीवनामध्ये या व्यसनाचे बाधा जीवनसंपविण्यास कारणीभूत ठरते त्यामुळे भागवत प्राप्तीसाठी नामस्मरण करताना शुद्ध भाव मनात ठेवून भगवंताला साकडे घातल्यास भगवंत भक्ताची इच्छा पूर्ण करतो भगवंताकडे जाण्याचा मार्ग संतांनी आपल्याला सांगितलेला असून संतांच्या अभंगातून सदभक्तीचा आलेख उंचावला जातो. शांती ब्रम्हे एकनाथ महाराज यांच्या अंगावर १०८ वेळा थुंकणाऱ्यालाही महाराजांनी दुखावले नाही यामुळे जीवनामध्ये अंगी शांतता बाळगणे स्वहिताचे असल्याचेही साक्षीताई यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी मृदंगाचार्य रवींद्र आपार, दादाराव सवडे, गायनाचार्य मुकिंदा महाराज शेडगे विठ्ठल महाराज कापसे बद्रीनाथ रामराव जमदाडे अशोक खांडेभराड संजू महाराज सवडे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संस्कृतीचे पालन करून सर्वांनी सण उत्सव आनंदाने साजरे करावे- वैजनाथ बोराडे



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

आपल्या संस्कृतीचे पालन करून सर्वांनी धार्मिक उत्सव आनंदाने साजरे करावेत, तसेच इतरांना त्याचा त्रास होणार नाही, याची काळजी सर्वांनीच घेणे आवश्यक आहे, असे आवाहन नगराध्यक्ष,मंठा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक वैजनाथ बोराडे यांनी आयोजित केलेल्या शांतता समितीच्या बैठकीत केले.

श्रीरामनवमी , महात्मा फुले जयंती , भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर मंठा पोलीस ठाणे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी दादाहरी चौरे , पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे , नगराध्यक्ष , बाजार समिती संचालक वैजनाथ नाना बोराडे, नायब तहसीलदार काळदाते , उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे , माजी उपनगराध्यक्ष सिराज पठाण , नगरसेवक राजेश खंदारे , उबेद बागवान , मुस्तफा पठाण , माजी ग्रामपंचायत सदस्य कय्युम कुरेशी , प्रकाश घुले , नगरपंचायत कर्मचारी इम्रान , मंठा तालुका मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष नागेशराव कुलकर्णी , ज्येष्ठ पत्रकार संतोष दायणा , तुकाराम मुळे , कृष्णा भावसार, पत्रकार संरक्षण समिती अध्यक्ष रणजीत बोराडे, हाफिज बागवान ,मोहसीन कुरेशी , जगदीश राठोड , इरफान सय्यद , विजय बोराडे , विजेश वाघमारे, यांच्यासह पोलीस पाटील उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना पोलीस उपविभागीय अधिकारी चौरे यांनी सांगितले की सण-उत्सव सर्व समाज बांधवांनी शांतते उत्साहात साजरी करून पोलीस प्रशासनात सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी बोलतांना पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे म्हणाले की , उत्सवाचा आनंद प्रत्येकाने घेतला पाहिजे; मात्र उत्सव करतांना इतरांना त्याचा त्रास होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. एकमेकांचा आदर करून उत्सवाचा आनंद घ्या, त्याचा बेरंग करू नका. उत्सवाच्या दरम्यान कोणी अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिस निरीक्षक निकाळजे यांनी दिला. महापुरुषांनी दिलेल्या शिकवणीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या जीवनात प्रगती करा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी पोलीस हेड कॉन्स्टेबल आनंद ढवळे, मांगीलाल राठोड , मनोज काळे यांच्यासह स्वप्निल गोंडगे व आदींची उपस्थिती होती.

# सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या बळावर भाजपा देशात १२ कोटी सदस्य बनविण्याचे लक्ष पूर्ण करेल -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने संपूर्ण भारतात आपली राष्ट्रीय सदस्यत्व मोहीम सुरू केली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत 'संघटन पर्व सदस्यत्व अभियान - २०२४' नावाने २०२४ च्या राष्ट्रीय सदस्यत्व स्वीकारले आहे. त्यापाठोपाठ अन्य अनेक नेत्यांनीही भाजप सदस्यत्वाचे नूतनीकरण केले आहे. या मोहिमेद्वारे सदस्यत्वाची सुविधा देण्यासाठी भाजपने ८८०००२०२४ हा मिस कॉल नंबर देण्यात आला असून नमो पद्वारे देखील पक्षामध्ये सामील होऊन सदस्यत्व स्वीकारण्याची व्यवस्था पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. या सर्व संघटन पर्वदरम्यान प्रत्येक जिल्हास्तरावर मंडल स्तरावर तसेच बूथ स्तरावर पक्षाची नोंदणी करण्यात आली आहे. या संघटन परवा मध्ये भारतीय जनता पक्षाचे सर्व




कार्यकर्ते तन-मन-धनाने सहभागी झालेले आहेत त्यामुळे भारतीय जनता पक्षाने १२ कोटी सदस्य नोंदणीचे ठरवलेले उद्दिष्ट लवकरच पूर्ण होईल व भारतीय जनता पक्ष पुन्हा एकदा जगातील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येईल असा विश्वास माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टीच्या संघटन पर्व या संघटनात्मक उपक्रमाच्या निमित्ताने माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांची छत्रपती संभाजी नगर शहर जिल्हा निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यानिमित्त भाजपा छत्रपती संभाजी नगर शहर जिल्हा कार्यालय येथे आयोजित बैठकीदरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी सक्रिय सदस्य व प्राथमिक सदस्य नोंदणी यासह बूथ समिती गठित करण्यासंदर्भात आढावा घेतला. यावेळी मंचावर संघटन मंत्री संजय कौडगे, मंत्री अतुल सावे आ.संजय केनेकर शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर किशोर पवार संजय खंबायते, प्रदेश सचिव किरण पाटील दिलीप थोरात यांच्यासह प्रदेश पदाधिकारी जिल्हा पदाधिकारी मंडल अध्यक्ष उपस्थित होते. भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता, पदाधिकारी, नेता, मा. आमदार, मा. खासदार, मा. मंत्री आपल्या कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष अभियानात सहभागी होणार असून सर्वांनी आपले उदिदष्ट १००% पूर्ण करणे आवश्यक आहे. भाजपा सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या घरावर पक्षाचा झेंडा फडकवायचा आहे. पक्षाचे कार्यालय सजवून गोड पदार्थांचे वाटप करायचे आहे. स्थापना दिनाच्या निमित्ताने ६ एप्रिल ला कार्यालयात प्रदर्शनी लावायची आहे. दुपारी बरोबर २ वाजता स्थापना दिवस संघटन पर्व यशस्वी केल्यावर 'संघटन पर्व संवाद' मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस कार्यकर्त्याशी संवाद साधणार आहेत. तसेच प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण हे कार्यकर्त्यांशी संवाद करून अभिनंदन करणार आहेत. एवढेच नव्हे तर प्रत्येक नवीन मंडलात विविध कार्यक्रम साजरे केले जाणार असल्याचे देखील यावेळी लोणीकर यांनी स्पष्ट केले. या बैठकीदरम्यान आमदार लोणीकर यांनी क्रांती चौक मंडळ, सातारा देवळाई मंडळ, पडेगाव मंडळ, गारखेडा मंडळ, कैलासनगर मंडळ, सिडको मंडळ, हडको मंडळ, गुलमंडी मंडळ, चिकलठाणा मंडळ, बेगमपुरा मंडळ व पदमपुरा मंडळ येथील प्राथमिक सदस्य नोंदणी सक्रिय सदस्य नोंदणी व बुथ समितीचा आढावा घेतला. यावेळी सुरेश बनकर, जालिंदर शेंडगे प्रवीण कुलकर्णी अशोक मुळे लक्ष्मीकांत थेटे शिवाजी दांडगे सागर पाले सिद्धार्थ साळवे दीपक खोतकर अनिल मकरिये दीपक ढाकणे गोविंद केंद्रे सचिन गुगळे यांच्यासह भाजपाच्या महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# हिंगोलीत भाजपची संघटन पर्व बैठक

## मंडळ निवडणुक अधिकाऱ्यांना संघटन मंत्र्यांकडून मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ एप्रिल**

भारतीय जनता पक्षाच्या मंडळ अध्यक्षांची लवकरच निवडणुक होणार असून यासंदर्भात दि ५ मार्च रोजी संघटनमंत्री संजय कौडगे यांच्या उपस्थितीमध्ये मंडळ निवडणुक अधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

यावेळी जिल्हाप्रभारी प्रवासी नेते परभणी जिल्हा भाजपचे माजी अध्यक्ष डॉ. सुभाष कदम, हिंगोली मतदारसंघाचे आमदार तानाजीराव मुटकुळे, शेळीमेंढी महामंडळाचे अध्यक्ष तथा माजी आ. रामराव वडकुते, हिंगोली जिल्हा मंडळ निवडणूक अधिकारी तथा कळमनुरीची माजी आ. गजाननराव घुगे, माजी नगर अध्यक्ष बाबाराव बांगर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, जिल्हा अध्यक्ष फुलाजीराव शिंदे, तेरा मंडळाचे निवडणूक अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत मंडळ निवडणुक अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना संघटनमंत्री संजय कौडगे यांनी मागील महिनाभरात निवडणूक अधिकाऱ्यांनी मंडळात केलेल्या प्रवासाचा आढावा घेतला. मंडळाध्यक्ष निवडण्यास पात्र असणाऱ्या मंडळाची निकष सांगितले तसेच मंडळनीहाय गठीत झालेल्या बूथ समित्या व सक्रिय सदस्यांची संख्या जाणून घेतली. ज्या मंडळात ५० टक्के पेक्षा जास्त बूथ समित्या गठीत झाल्या आहेत आणि सक्रिय सदस्य अपेक्षित प्रमाणात नोंद झाली आहे त्याच मंडळात निवड प्रक्रिया होईल. मंडळ अध्यक्ष निवडणूक संदर्भात निवडणूक अधिकाऱ्यांनी त्या मंडळात राहणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून तीन नावाची शिफारस करायची आहे. ज्या नावांची शिफारसी करायची आहे तो कार्यकर्ता स्वतः प्राथमिक सदस्य नोंद करून त्यांच्या रेफरलं कोड वरून किमान १०० सदस्य नोंदवून सक्रिय सदस्य झालेला असावा. (सक्रिय सदस्य होत असताना त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या सक्रिय सदस्य स्वतः ची १०० ऑनलाईन भरून पावती घेतलेली असावी. ज्या ३ कार्यकर्त्यांच्या नावाची शिफारस करायची आहे ते किमान मागील ३ वर्षापासून भारतीय जनता पार्टीच्या कामात सक्रिय असावा. ज्या ३ नावाची शिफारस करायची आहे त्यांचं वयोमर्यादा ३५ ते ४५ वर्षे असावी, मंडळाच्या तालुका अध्यक्ष साठी शिफारस करत असताना त्या मंडळाची सामाजिक स्थिती विचारात घ्यावी. अध्यक्षासाठी शिफारस करताना त्यामध्ये सामाजिक राजकीय दृष्ट्या सक्रिय आणि सक्षम असणाऱ्या महिला/ एससी/ एसटी कार्यकर्त्यांचा विचार सुद्धा करावा.

यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनीही मार्गदर्शन केले. जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांनी प्रास्ताविक केले तर सरचिटणीस उमेश नागरे यांनी आभार मानले.

# शासनाने घेतली अपघातग्रस्त महिलांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी

## २२ कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ एप्रिल**

वसमत तालुक्यातील गुंज येथील अपघातग्रस्त महिलांच्या १३ मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने घेतली असून २२ कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ ही दिला जाणार आहे. त्यानुसार महसूलच्या अधिकाऱ्यांनी शनिवार दि ५ मार्च रोजी गुंज येथे भेट देऊन पाहणी केली.

वसमत तालुक्यातील गुंज येथील सात मजूरदार महिलांचा शुक्रवार दि ४ मार्च सकाळी आलेगाव शिवारात कामासाठी जात असतांना ट्रॅक्टर विहीरीत पडून मृत्यू झाला. पोलिस, महसूल आणि पंचायतच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी व गावात जाऊन पाहणी केली. या अपघातातील मयत महिलांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रूपये अर्थसहाय्य देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. त्यानंतर आता शासनाने विविध योजनांचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या सुचनेवरून उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार शारदा दळवी यांच्या पथकाने आज गुंज येथे जाऊन अपधातग्रस्त महिलांच्या कुटुंबियांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यामध्ये या ठिकाणी असलेल्या तेरा मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने धेतली असून या मुलांची नावे देखील या पथकाने नमुद करून घेतली आहेत. यामध्ये दोन विद्यार्थी नांदेड येथे शिक्षण घेतात. तर इतर विद्यार्थी गावातील शाळेतच शिक्षण घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या विद्यार्थ्यांची माहीती शासनाकडे कळवली जाणर आहे. याशिवाय या भागात राहत असलेल्या २२ कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यसाठी गावठाण विस्ताराचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केला जाणार आहे. त्यानंतर घरकुल मंजुर केले जाणार आहे. तसेच दिव्यांग असलेल्या दोन व्यक्तींना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ दिला जाणार असून इतरांना श्रावण बाळ योजनेचा लाभ दिला जाणार आहे.

# रूपूर तांडा येथे वादळी वाऱ्यामुळे जि प च्या शाळेची पत्रे उडाली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ एप्रिल**



औंढा नागनाथ तालुक्यात बहुतांश ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे हळद उत्पादक शेतकऱ्यांची एकच तारांबळ उडाली, तर अनेक ठिकाणी विजेचे खांब उन्मळून पडले तसेच रुपुर तांडा येथे शाळेची पत्रे उडाली.

औंढा नागनाथ तालुक्यात गुरुवार दिनांक ३ डिसेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास अचानक हवामानात बदल होऊन रिमझिम पाऊसासह सोसाट्याच्या वारा सुटला, त्यामुळं रुपुर, सावंगी, सिद्धेश्वर, कॅम्प, रुपुर तांडा, गोजेगाव, धार आदी परिसरात वादळी वाऱ्यामुळे हळद, कांदा बीज व भाजी उत्पादक शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले तसेच रूपुर कॅम्प येथे विजेचे खांब व झाडे उन्मळून पडली तर रुपुर तांडा येथील शाळेची पत्रे उडाल्यामुळे शैक्षणिक साहित्याचे नुकसान झाले. मथा व रुपूर परिसरात कांदा बीज पिकाची अनेकांनी लागवड केली होती. वादळी वाऱ्यामुळे त्यांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाल्याची माहिती आहे. तालुक्यातील गोळेगाव, वगरवाडी व नागेशवाडी परिसरात मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. पुढील दोन दिवस पुन्हा वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि जोरदार पावसाचा इशारा दिला देण्यात आल्यामुळे सर्व पशुपालकांनी सावधगिरी बाळगावी. जनावरे झाडांपासून आणि विजेच्या खांबांपासून दूर ठेवा. गोठ्यांची तपासणी करावी. चारा, पाणी आणि औषध साठवून ठेवावे आणि आपत्तीच्या वेळी जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे आवाहन औंढा तहसील कार्यालयातून करण्यात आले आहे.



**हिंगोली– शहरासह जिल्ह्यात श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असून श्रीराम नवमीच्या पूर्वसंध्येला येथील शहर पोलिसांच्यावतीने शहरातून विविध मार्गावर पथसंचलन काढण्यात आले. यावेळी पोलिस निरीक्षक पाडळकर यांच्यासह पोलिस अधिकारी, कर्मचारी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### औंढ्यात हळद काढणीसाठी लगबग सुरू



हिंगोली– तालुक्यात हळद काढणीची कामे वेगाने सुरू आहेत. या कामात शेतकऱ्यांची कुटुंबीयांसह लगबग सुरू आहे. विशेष म्हणजे, कुटुंबातील लहान मुले देखील या कामात मदत करीत आहेत. त्यांचे योगदान हळद काढणीच्या कामाला वेग आणत आहे. हळद काढणीच्या कामात लहान मुलेही आई-वडिलांसोबत काम करताना दिसत आहेत. हळद काढणीच्या कामात लहान मुलांचा सहभाग शेतकरी कुटुंबांची एकजूट दाखवतो. ही परंपरागत प्रक्रिया जतन करण्यात मदत करते. शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य मेहनतीने काम करत आहेत आणि त्यातून चांगले आर्थिक फळ मिळण्याची अपेक्षा आहे.

### रामनवमी निमित्त जिल्ह्यात चोख पोलिस बंदोबस्त

हिंगोली– श्रीराम नवमीनिमित्त पोलिस विभागाच्यावतीने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्ह्यात चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे तसेच संबंधित पोलिस ठाण्यांच्या हद्दीत पोलिसांनी पथसंचलन केले तसेच शांतता समितीच्या बैठकाही घेतल्या आहेत. श्रीराम नवमीनिमित्त राज्य राखीव दलाच्या दोन तुकड्या, आरसीपीच्या दोन तुकड्या, ६० पोलिस अधिकारी, ३८८ अंमलदार, ५३० पुरूष होमगार्ड, १२० महिला होमगार्ड, सुसज्ज स्थितीतील ४ पाच टनी वाहनचालकासह एक एटीएस पथक, २ बीडीडीएस पथक तैनात करण्यात आले आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांततेत श्रीराम नवमी साजरी करावी असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.



हिंगोली– येथील शासकीय विश्रामगृहात शनिवारी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष बी डी बांगर यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शहराध्यक्ष केशव दुबे, सुजय देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते. छाया– सुनील पाठक

# रामनवमीनिमित्त महाआरतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ एप्रिल**

शहरातील महावीर चौकात आम्ही हिंदू धर्मरक्षकांच्यावतीने दि ६ एप्रिल रोजी श्रीराम नवमी निमित्त रात्री ८.११ वाजता महाआरतीचे आयोजन करण्यात आले असून यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत लघुनाट्य सायंकाळी ७ वाजता दाखविण्यात येणार आहे.

हिंगोली शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या निमित्त भव्य मिरवणुक काढल्या जाते. येथील हिंदू धर्मरक्षकांच्यावतीने महावीर चौकात आयोजित महाआरती आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत लघुनाट्य दाखविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प पू खुशालचंद महाराज, प पू भगवान महाराज, प पू विनय महाराज, प पू शिवा महाराज, प पू महागौरादास प्रभू, प पू राजू महाराज या संतांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

याप्रसंगी आ. तान्हाजीराव मुटकुळे, आ संतोष बांगर, विहिंपचे जिल्हाध्यक्ष डॉ मुरलीधर तोष्णीवाल, उपाध्यक्ष साबरमल अग्रवाल, ओमप्रकाश हेडा, माजी आ. गजाननराव घुगे, डॉ किशन लखमावार, बाबुराव कदम, दिपक निमोदीया, भास्करराव पाठक, डॉ अमोल धुमाळ आदींची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राजेंद्र हलवाई, अरूण कहार, कैलास श्रीनाथ यांनी केले आहे.

# ग्रामीण भागातील रूग्णांना तातडीची आरोग्य सेवा द्या– उपविभागीय अधिकारी भूते

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ एप्रिल**



ग्रामीण भागातील सर्व रूग्णांना तातडीची आरोग्य सेवा मिळाली पाहीजे याबाबतचे नियोजन करून आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांनी सतर्क राहण्याच्या सूचना कळमनुरीच्या उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते यांनी दिल्या आहे.

शासनाच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत उपविभागीय अधिकारी भूते यांनी आखाडा बाळापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धीनी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडीला भेट देऊन पाहणी केली. यावेळी सरपंच भिमाबाई नरवाडे, डॉ माने, वाघमारे, मंडळ अधिकारी शिल्पा सरकटे, ग्राम महसूल अधिकारी एकनाथ कदम, गोविंद भोरगे उपस्थित होते. यावेळी भूते यांनी रूग्णांशी संवादही साधला तसेच त्यांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांची माहीती घेतली. ग्रामीण भागातील रूग्णांना तातडीने आरोग्य सेवा मिळावी यासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी योग्य नियोजन करावे. केवळ अधिकारी कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्यामुळे रूग्णाला उपचार मिळाले नाही असे प्रकार होता कामा नये. याशिवाय रूग्णाला कोणतेही सबळ कारण नसताना रेफर केले जात असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे आरोग्य सेवा मिळत नाही. अनेक वेळा रूग्णांना गंभीर प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे. सदर प्रकार टाळण्यासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रूग्णांवर उपचार केले पाहीजेत अशा सूचना दिल्या. या शिवाय रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांना सौजन्याची वागणूक देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

ग्रामपंचायत कार्यालयातून येणाऱ्या गावकऱ्यांना आवश्यक असलेले प्रमाणपत्र वेळेवर मिळाले पाहीजे. किरकोळ प्रमाणपत्रासाठी गावकऱ्यांना ग्रामपंचायत कार्यालयात चकरा मारण्याची वेळ येऊ देऊ का अशा सूचनाही उपविभागीय अधिकारी भूते यांनी दिल्या.

अंगणवाडी केंद्रातून बालकांना नियमितपणे पोषणआहार दिला पाहीजे. तसेच गरोदर व स्तनदा माता यांना घरपोच आहार पुरवठा करावा, अंगणवाडी केंद्रातील एकही बालक कुपोषित राहू नये याची दक्षता अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी घ्यावी अशा सूचना केल्या.

# सावरखेडा येथील जि प शाळेला शिक्षणाधिकारी सोनटक्केंची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ एप्रिल**

तालुक्यातील सावरखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस शिक्षणाधिकारी संदीप कुमार सोनटक्के यांनी अचानक भेट देऊन शाळेची पाहणी केली.

शनिवार दि ५ मार्च रोजी सकाळी जिल्हा परिषद चे शिक्षणाधिकारी संदिप कुमार सोनटक्के यांनी जिल्हा परिषद प्रशाला सावरखेडा येथे भेट दिली. यावेळी त्यांनी निपुण महाराष्ट्र कार्यक्रम अंमलबावणी बाबत तपासणी केली तसेच विद्यार्थी वाचन घेऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासणी केली. तसेच शिक्षकांना सुद्धा मार्गदर्शक सूचना दिल्या. यावेळी शिक्षणाधिकारी संदीप कुमार सोनटक्के यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबाबत तसेच शाळेच्या प्रगती बाबत समाधान व्यक्त केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक कैलास धनवे, सहशिक्षक सुभाष कोटकर, श्रीमती कावरखे, श्रीमती अनुसया देशमुख यांची उपस्थिती होती.

# जुन्या पोलिस अधीक्षक कार्यालयात गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ एप्रिल**



नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक उमाप यांच्या आदेशावरून तसेच पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या सूचनेवरून जिल्ह्यातील तेरा पोलिस ठाण्यांतर्गत गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल आता हिंगोली येथील जुन्या पोलिस अधीक्षक कार्यायातील एका कक्षात सुरक्षित ठेवण्यात येत आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर हा मुद्देमाल संबंधितांना तत्काळ परत करण्यासाठी तसेच जप्त मुद्देमाल सुरक्षित राहण्यासाठी ही उपाययोजना पोलिस विभागाने केली असल्याची माहीती सुत्रांनी दिली आहे.

येथील रेल्वे स्टेशन रोडवर असलेल्या जुन्या पोलिस अधीक्षक कार्यालयात गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल तसेच न्यायालयात प्रलंबीत असलेल्या वाहनांना जमा केल्या जात आहे. यासाठी एक पोलिस अधिकारी आणि चार सुरक्षा रक्षक या कक्षाचे संरक्षण करणार आहेत. जिल्ह्यातील तेरा पोलिस ठाण्यांतर्गत विविध गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल आणि वाहने या कार्यालयातील कक्षात जमा करण्याचे काम दि ४ मार्च रोजी पोलिस अधिकारी भोसले यांच्या निगराणीत करण्यात येत होते.

# मुदखेड तालुक्यातील रोहपिंपळगाव येथे पती- पत्नीचा मृत्यू

## पतीचा गळाफास तर पत्नी आढळली मृत अवस्थेत

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.०५ एप्रिल**

तालुक्यातील रोहीपिंपळगाव येथील शेतकरी बाबासाब बाजीराव शिंदे वय ४० वर्ष यांनी गळफास घेतली तर पत्नी रुक्मिणी बाबासाब शिंदे वय ३५ वर्ष हे त्याच ठिकाणी मृत्यू अवस्थेत दिसून आल्याची घटना दि.४ एप्रिल रोजी दुपारी एक वाजताच्या दरम्यान त्यांच्या शेतात घडली.

रोहीपिंपळगाव येथील शेतकरी बाबासाब बाजीराव शिंदे व त्यांच्या पत्नी रूक्मीनबाई बाबासाब शिंदे हे दोघेही रोहीपिंपळगाव आपल्या घरून सकाळी नेहमीप्रमाणे शेतामध्ये गेले होते. परंतु दुपारी एकच्या दरम्यान बाबासाब शिंदे हा लिंबाच्या झाडाला गळफास घेतल्याचं दिसून आले तर पत्नी त्याच ठिकाणी मृत्यू अवस्थेत जमिनीवर दिसून आली या



घटनेची माहिती आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी दिल्याने गावातील नागरिकांनी बाबासाब शिंदे यांच्या शेताकडे धाव घेतली. या घटनेची माहिती रोहीपिंपळगाव येथील पोलीस पाटील यांनी मुदखेड पोलीस ठाण्याला कळविली. या घटनेची माहिती मिळताच पोलिस उपविभागीय अधिकारी डेनियल बेन, मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे , पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे, बिट जमादार दिलीप चक्रधर, रमेश पुणेगोविदवाड, बाळवंत कदम, प्रकाश सुनकमवार आदींनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन पतीने आत्महत्या केली तर पत्नी बेशुद्ध अवस्थेत आढळून आल्याचे पोलीसांकडून सांगण्यात आले. मुदखेड ग्रामीण रुग्णालयात पती-पत्नीला दाखल करण्यात आले होते. परंतु डॉक्टरांनी रुक्मीणबाई शिंदे यांचा मृत्यू झाला असे सांगितले. सदर घटना आत्महत्या आहे की? हत्या हे मात्र शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होईल असे मुदखेड पोलीसांनी सांगितले.

# श्री राम जन्मोत्सव समितीच्या वतीने आज शहरात शोभायात्रा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ एप्रिल**

श्री राम नवमी निमित्त राम जन्मोत्सव समितीच्या वतीने उद्या दि.६ एप्रिल रोजी शहरात शोभायात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती श्री राम जन्मोत्सव समितीच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

सन २००६ पासून रामनवमी साजरी येत आहे. २०११ पर्यंत मोटारसायक रॅली काढण्यात येत होती. त्यानंतर शोभायात्रा काढण्यात येत असून या शोभायात्रेत लाखो भावीक सहभागी होत आहेत. यावर्षीही दि.



६ एप्रिल रोजी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यात्रेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. दि. ६ एप्रिल रोजी रामघाट येथिल राममंदीर पासून पालखी काढून हनूमान चालीसा पठण करण्यात येईल. त्यानंतर रेणूकामाता मंदीरात आरती करून प्रभू श्रीरामाच्या मुर्तीची अनावरण करून शोभायात्रेची सुरूवात होणार आहे. ही शोभायात्रा जुना मोंढा, महावीर चौक, हनुमान पेठ, कलामंदीर, आयटीआय, श्रीनगर, वर्कशॉप कॉर्नर मार्गे भाग्यनगर येथील राम मंदीरात या यात्रेचा समारोप होणार आहे. नांदेड जिल्ह्यात एकमेव शोभायात्रा असल्याने जिल्ह्यातील जवळपास ७ लाख भावीक सहभागी होतील अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली. या यात्रेत महाकुंभ मेळाव्यासह ११ देखावे ठेवण्यात आले आहेत. शोभायात्रेतील महिलांची संख्या पाहता सुरक्षेच्या दृष्टीकोणातून २ हजार २०० स्वंयसेवक तैनात राहणार असुन ही शोभायात्रा नसून उत्सव असल्याचे राम जन्मोत्सव समितीच्या वतीने सांगण्यात आले. या पत्रकार परिषदेस डॉ. रमेश नारलावार, मोहन पाटील, गणेशसिंह ठाकूर, संतोष कालू ओझा आदी उपस्थित होते.

**नांदेड**-नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी ८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# सामाजिक समतेचा संदेश देणारी 'ग्रेट सम्राट अशोका मॅरेथॉन २०२५' उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ एप्रिल**



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व महापुरुषांच्या जयंतीनिमित्त सामाजिक समता व एकात्मतेचा संदेश देणारी 'ग्रेट सम्राट अशोका मॅरेथॉन २०२५' ही पाचवी स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सकाळी ६ वाजता उत्साहात पार पडली.

या उपक्रमाचे आयोजन बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव गायकवाड आणि आंबेडकरी चळवळीचे नेते संतोष सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

स्पर्धेची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर साहेबराव गायकवाड यांनी हिरवी झेंडी दाखवून मुलींच्या गटाच्या मॅरेथॉनला सुरुवात दिली. या स्पर्धेत पुरुष व महिला गटांमध्ये अनुक्रमे ५ कि.मी. आणि ३ कि.मी. अंतराच्या शर्यती घेण्यात आल्या. मराठवाडा परिसरातील शेकडो युवक-युवतींनी सहभाग घेत प्रचंड उत्साहाने सामाजिक एकात्मता व निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला.

ही मॅरेथॉन फक्त धावण्याची स्पर्धा नाही, तर सामाजिक समता, बंधुता आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रचार करणारा चळवळीचा एक भाग आहे. तरुणांनी सजगपणे समाजपरिवर्तनात भाग घ्यावा असे आवाहन करत पुढील वर्षी ही स्पर्धा अधिक व्यापक आणि भव्य स्वरूपात राबवली जाईल आणि नांदेडचेच तरुण विजेते ठरतील असा विश्वास साहेबराव गायकवाड यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वंचित बहुजन आघाडीचे प्रवक्ते फारूख अहेमद, आंबेडकरी भाष्यकार प्रभू सावंत, गुट्टे अकॅडमीच्या संचालिका प्रा. डॉ. आशालता गुट्टे, युवा नेते प्रीतम जोंधळे, बौद्ध धर्म अभ्यासक कवी अतिरत्न वाघमारे, प्रा. इंगोले आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा सत्कार लखन कारले आणि मिशन ऑफिसर अकॅडमीच्या टीमकडून करण्यात आला. या स्पर्धेचे सूत्रसंचालन आतिश ढगे यांनी केले.

या स्पर्धेत महिला गटात ३ कि.मी. धावण्यात परभणी येथील पवार हिने प्रथम क्रमांक पटकावला. व्दितीय परभणी येथील वर्षा कदम तर तृतीय नांदेड येथील अस्मिता कांबळे हिने पटकावला तर उत्तेजनार्थ वैष्णवी दुधमल, दर्शना वाघमारे यांना देण्यात आले. पुरूष गटात ५ कि.मी. धावण्यात नाशिक येथील ऋषिकेश वावरे, व्दितीय लातूर येथील निवृत्ती बंडेवार तर पुसद येथील प्रणव राठोड याने तृतीय क्रमांक पटकावला. उत्तेजनार्थ पारितोषिक परभणी येथील योगेश पडके, यवतमाळ येथील सुजित राठोड यांना देण्यात आले. स्पर्धेत प्रथम विजेत्यास ५ हजार रोख व स्मृती चिन्ह, व्दितीय रोख ३ हजार व स्मृती चिन्ह, तृतीय २ हजार व स्मृती चिन्ह तर उत्तेजनार्थ प्रत्येकी रोख १ हजार रुपये व स्मृती चिन्ह देवून गौरवीण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी करण गच्चे, आशिष सावंत, सवि दीपके, बंटी जोंधळे, अफरोज भाई, अक्षय पोहरे, सूरज कवडे, अमोल धुतले, अभय चौहान, कृपेश नरवाडे, आकाश शिंदे, श्रेयश निखाते, अजय राऊत (राज गोमस्कर), अतुल भुजबळ, बुद्धम गायकवाड, विकास सोनकांबळे यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त



### उमरी मॉडर्न इंग्लिश स्कूलने ओलंपियाड परीक्षेत बाजी मारली

**उमरी**-उमरी मॉडर्न इंग्लिश स्कूलने आपली दरवर्षीची परंपरा कायम राखत यावर्षीच्या ऑलिम्पियाड या इंटरनॅशनल लेव्हलवर घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये बाजी मारली असून आय एम ओ आय एच ओ एन एस ओ आय जी के ओ अशा विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून यावर्षी तब्बल एकोणवीस सुवर्णपदके मिळवण्याचा विक्रम केला आहे. यशस्वी जैन श्रीराज पेंडलवार पूर्वी संगणवार अमेय मुक्कावार युवराज ढगे साई पटकुटवार अर्पित माने सांची खंडेलोटे माहि असावा आराध्या चव्हाण प्रणव ढेरे दिव्या ढगे ऋषिकेश करपे अक्षरा बी जमवार कुणाल उत्तरवार राजवीर राजपुरोहित लक्ष्मीकांत पांचाळ हिंदी ओलंपियाड मध्ये श्रीराज पेंडलवार याचा झोनल २५ आणि रिजनल २६ इंटरनॅशनल रँक २८ मिळवला आहे.या यशाबद्दल मुख्याध्यापिका सौ.अणुराधा संजय कुलकर्णी, सर्व स्टाफने परिक्षम घेतलें तर, विद्यार्थी घवघवीत यश संपादन केल्या बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

### अनिल पाटील नागठाणेकरे शिवजयंती दिनी सन्मानित

**उमरी**-उमरी तालुक्यातील प्रसिद्ध उदोजक अनिल पा नागठाणेकर यांचा भोकर येथे शिवजयंती निमित्त प्रा.नितीन बानगुडे पाटील यांच्या व्याख्याना दरम्यान सत्कार करून सन्मानित करण्यात आले आहे. उमरी येथील अनिल डेकोरेशन व्यवसायियक अनिल पाटील नागठाणेकर यांना उत्कृष्ट उदोजक म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आले असल्याने भोकर येथिल शिवजंयती उत्सवात यथोचित सन्मान करण्यात त्यांचा गौरव करण्यात आला आहे . यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पिपळगाव येथील वेंकट स्वामी महाराज, प्रमुख जागतिक व्याख्याते प्रा.नितीन बानगुडे पाटील कपाटे बाबा, शिव जन्मोत्सव समिती अध्यक्ष आनंदराव पाटील शिंधीकर, कपिल पाटील किन्हाळकर , विश्वंभर पवार, रावसाहेब पाटील नागठाणेकर, मधुकर बोथीकर, नंदू पाटील गोळेगावकर आदी सह समिती सदस्यासह व्यापारी शिवप्रेमी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते अनिल पाटील वडजे नागठाणेकर यांना उत्कृष्ट उदोजक म्हणून पुरस्कार प्राप्त झाल्याने त्यांचा ठिक ठिकाणी मोठया प्रमाणात स्वागत होत असून त्यांचा भावी तरूण पिडीनी आदर्श घेण्या जोगे आहे .



### प्रथम शिष्यवृत्ती प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**मुदखेड**-मुदखेड तालुक्यातील बारड येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेने गुणवत्तेची परंपरा कायम राखली असून एन एम एम एस परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे यावेळी १८ शिष्यवृत्तीधारक गुणवंत विद्यार्थी तर पंजाब येथे आयोजित ३०व्या सब ज्युनिअर नॅशनल बेसबॉल स्पर्धेत श्रद्धा बाबुराव कुलुपवाड या विद्यार्थिनीने कांस्य पदक प्राप्त केले या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान शालेय समिती व शाळा प्रशासनाच्या वतीने करण्यात आला आहे. यावेळी गटशिक्षणाधिकारी प्रिया डहाळे, शिक्षण विस्तार अधिकारी सुरेश पाटील, केंद्रप्रमुख अरुणकुमार अतनुरे, शिक्षणप्रेमी विलास देशमुख, शा. व्य. समिती अध्यक्ष प्रकाश देशमुख,मु.अ. शुभांगीनी तळणकर, कैलास पुलकुंटवार, योगेश रत्नपारखी,शिक्षक प्रसाद जाधव, श्रीपाद बोरिकर, संतोष राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. जि.प.हायस्कूल शाळेत सतत स्पर्धात्मक परीक्षेला वाव दिल्या जात असून बीटीएस, एन एम एम एस, नवोदय, स्कॉलरशिप, होमीबाबा, अशा अनेक परीक्षा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी सराव करून घेतल्या जातात त्यामध्ये अनेक विद्यार्थी गुणवत्तेत झेप घेऊन पुढील शैक्षणिक कार्यासाठी अग्रेसर होताना दिसतात. गरिबाच्या लेकरांसाठी बारड जिल्हा परिषद शाळा ही वरदान ठरली असून अनेक विद्यार्थी नवोदय कॉलरशिप शिष्यवृत्तीधारक बनत असल्याने त्यांच्या बारावीपर्यंतच्या शिक्षणाचा खर्च शासन स्तरावरून होत असल्याने याबाबत पालक वर्गातून समाधान व्यक्त केल्या जात आहे. मु.अ.शुभांगीनी तळणकर यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांना शिक्षक ठक्कुरवार , श्रीपाद बोरीकर सुहास अंबाड, प्रसाद जाधव, संतोष राऊत हे विद्यार्थ्यांना यशस्वीपणेअभ्यासात सखोल मार्गदर्शन करत असतात. यावेळी गुणवंत विद्यार्थी प्रेरणा सुकापुरे , वैष्णवी धुडकेवार यांनी शाळेत चालणाऱ्या शैक्षणिक उपक्रमाबाबत सखोल माहिती देत मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मु.अ.शुभांगीनी तळणकर यांनी केले सूत्रसंचालन संतोष राऊत तर आभार सुहास अंबाड यांनी मानले. कार्यक्रमासाठी यशस्वीतेसाठी शाळा प्रशासन शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# विहिंप तर्फे श्रीराम जन्मोत्सव निमित्त मोटरसायकल रॅली

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ एप्रिल**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विश्व हिंदू परिषद बजरंग दल मातृशक्ती दुर्गा वाहिनी यांच्या तर्फे श्रीराम जन्मोत्सव निमित्त भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

मोटर सायकल रॅली ६ एप्रिल रोजी सकाळी ९ वा.पंचवटी हनुमान मंदिर महावीर चौक ते श्री गजानन महाराज मंदिर मालेगाव रोड ह्या मार्गाने जाणार आहे. श्री पंचवटी हनुमान मंदिर महावीर चौक येथे आरती आणि हनुमान चालीसा पठण करून ह्या मोटरसायकल रॅलीची सुरुवात होणार आहे व समारोप श्री गजानन महाराज मंदिर मालेगाव रोड येथे होणार आहे.दरवर्षी या शोभायात्रेत हिंदू तरुण,मातृशक्ती,दुर्गा यांचा उत्साह पूर्वक सहभाग असतो. या रॅलीचे आकर्षण म्हणजे श्री राम ललाची आकर्षक अशी सुंदर मूर्ती आहे.

नेहमी प्रमाणे या भव्य मोटरसायकल रॅलीचे जागोजागी रामभक्त स्वागत करनार आहेत. ह्या भव्य मोटर सायकल रॅलीसाठी विश्व हिंदू परिषद बजरंग दल मातृशक्ती दुर्गा वाहिनी चे सर्व कार्यकर्ते एक महिना अतोनात परिश्रम घेत आहेत. तसेच विश्व हिंदू परिषद बजरंग दल मातृशक्ती दुर्गावाहिनी यांच्यातर्फे सर्व रामभक्तांना आवाहन करण्यात येते कि जास्तीत जास्त संख्येने या भव्य मोटरसायकल रॅली मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# मृतांच्या नातेवाईकांचे सांत्वन करताना खा. रवींद्र चव्हाण झाले भावूक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ एप्रिल**

आलेगाव शिवारात ट्रॅक्टर विहीरीत कोसळून शुक्रवारी सकाळी झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या महिला मजुरांच्या नातेवाईकांचे खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी शनिवारी गुंजगाव ता. वसमत येथे जाऊन सांत्वन केले. अंगावर शहारे आणणाऱ्या या दुर्घटनेची माहिती नातेवाईकांकडून ऐकताच खासदार रवींद्र चव्हाण भावूक झाले. यावेळी त्यांनी मृतांच्या नातेवाईकांना तात्काळ शासकीय मदत उपलब्ध करून देण्याची सूचना प्रशासकीय अधिकाऱ्यांना केली.

आलेगाव येथील शेतमजूर शेतात कामासाठी जात असताना ट्रॅक्टर विहिरीत पडून ७ महिलांना आपले प्राण गमवावे लागले.काही जण गंभीर जखमी झाले . या दुःखद प्रसंगी पीडित कुटुंबीयांना धीर देण्यासाठी नांदेड जिल्ह्याचे *खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांनी गुंजगाव या. वसमत येथे भेट दिली. यावेळी पीडित कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते. या सर्वांची त्यांनी आस्थेवाईकपणे विचारपूस करून त्यांना धीर दिला. खासदार चव्हाण यांच्यासोबत यावेळी भागवनराव आलेगांवकर, कॉंग्रेसचे जिल्हा शहर अध्यक्ष अब्दुल सत्तार, राजेश पावडे, महेश देशमुख, विठ्ठल पावडे, निरंजन पावडे,धनंजय सूर्यवंशी,गफार सेठ, अजीजभाई कुरेशी, सत्यपाल सावंत,सुरज शिंदे यांच्यासह कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच प्रशासनतील अधिकारी उपस्थित होते.

## मुख्याधिकारीपदी मोरे यांनी पदीभार स्वीकारला

**तभा वृतसेवा**
**कुंडलवाडी, दि.०५ एप्रिल**



कुंडलवाडी नगर परिषदेचे मुख्यधिकारी म्हणून दीपक मोरे यांनी पदभार स्विकारला आहे. कुंडलवाडी नगरपरिषदेला गेल्या २३महिन्या पासून पूर्ण वेळ मुख्याधिकारी नसल्या मुळे शहरातील विकास कामे होण्या करीता विलंब लागत होता, कामे वेळेवर होत नव्हते त्या मुळे नागरिकांना त्रास होत होता दीपक मोरे यांनी मुख्याधिकारी पदचा पदभार स्वीकारला असल्याने नागरिकां मध्ये समाधान व्यक्त होत असून शहरातील नागरिकाचे व विकासाची कामे वेळेवर होतील अशी अपेक्षा व्यक्त करीत आहेत.

## बारसगाव ग्रामस्थांचा स्वच्छतेसाठी पुढाकार

# कचरामुक्त गावाचा संकल्प

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ एप्रिल**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत दुसऱ्या टप्प्यात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनावर भर देत गावांची शाश्वत स्वच्छता ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अर्धापूर तालुक्यातील बारसगावने कचरामुक्त गाव करण्याचा संकल्प केला आहे.

दि. ४ एप्रिल रोजी अर्धापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डी. एस. कदम, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ मिलिंद व्यवहारे, गटशिक्षणाधिकारी गोडबोले, विस्तार अधिकारी व्ही. एम. मुंडकर, आरोग्य विस्तार अधिकारी एस.पी. गोखले, शिक्षण विस्तार अधिकारी निजाम शेख, केंद्रप्रमुख विकास चव्हाण, तालुका गट समन्वयक राजेश जाधव आर्दीच्या उपस्थितीत गावात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या वेळी प्रभात फेरी, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, तसेच घरोघरी ओला व सुका कचरा वेगळा टाकण्यासाठी डस्टबिनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात ग्रामविकास अधिकारी गणेश आडे, बालाजी गोदरे, अमोल बारसे, शंकरराव बारसे, सारजाबाई खंडागळे, मनीषा खंडागळे, सविता गोदरे, अंगणवाडी सेविका गंगासागर मोरे, आशा वर्कर गंगाबाई बकाल, रंजीता ताटे यांच्यासह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# चक्री येथे श्रीराम नवमी व हनुमान जयंतीनिमित्त श्रीराम कथेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**निवघा बा, दि.०५ एप्रिल**

हदगाव तालुक्यातील मौजे चक्री येथे श्रीराम नवमी व महारुद्र हनुमान जयंतीनिमित्य अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व भव्य राम कथेचे आयोजन समस्त चक्री ग्रामस्थांनातर्फे करण्यात आले आहे

या अखंड हरिनाम सप्ताहाला शनिवार दि.५ एप्रिल रोजी सुरुवात झाली असुन .या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नवसाला पावणारा मारोती म्हणुन येथिल हनुमान देवस्थानाची महाराष्ट्रभर ओळख आहे. आठवड्यातील दर शनिवारी सकाळी ५ वाजल्यापासूनच येथे विविध भागातून व्यापारी, डॉक्टर, शासकीय कर्मचारी,रुग्ण, राजकीय नेते,नविन नोकरी लागलेले तरुण-तरुणी आपला नवस पुर्ण झाल्याने आरती व दर्शनास हजेरी लावतात.येथे बोललेला नवस पूर्ण झाल्याने महाराष्ट्रातील विविध भागातील भक्त मंडळी नगर भोजन म्हणून संपूर्ण गावाला गाव जेवण देतात.प्रत्येक वर्षाअखेर अंदाजे ३० ते ३५ नगर भोजन नवस पूर्ण झालेली भक्त मंडळी हनुमंत रायाचे चरणी दुग्ध अभिषेक करून संपूर्ण गावाला गाव जेवण आपला नवस पुर्ण करतात.

दर वर्षी प्रमाणे यावर्षीही येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असुन त्यानुसार दररोज पहाटे ४ ते ६ काकडारती भजन, सकाळी ६ ते ९ ज्ञानेश्वरीपारायण, दुपारी १ ते ४ श्रीराम कथा , सायं ५ ते ७ हरिपाठ व रात्री ८:३० ते १०:३० हरिकीर्तन, असे दैनंदिन कार्यमाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहात महाराष्ट्रातील विविध भागातील प्रसिद्ध कीर्तनकारांची हरी कीर्तने होणार आहेत. शनिवार दि.१२ २०२५ रोजी सकाळी ८ वाजता हनुमान जयंतीनिमित्त श्रीची मिरवणूक व ग्रामप्रदषनेनंतर ११ ते १ या वेळेत संतोष महाराज पळसोनेकर यांचे काल्याचे कीर्तन व त्यानंतर महाप्रसादाने या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे.

परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताह व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन मौजे चक्री येथील समस्त ग्रामस्थांतर्फे करण्यात आले आहे.

# नागरीकांच्या अडी-अडचणींचे गावातच निराकरण झाले पाहिजे : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ एप्रिल**

महाराष्ट्र राज्य निर्मीती नंतर पहिल्यांदाच महायुतीला ऐतिहासिक बहुमत मिळाले ., महायुती सरकार सामान्य नागरिक, लाडक्या बहिणी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे,मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसाचा कृती कार्यक्रम अंतर्गत म शासन आपल्या दारी हा उपक्रम राबवण्यात येत असुन छोट्या-मोठ्या कामासाठी तालुक्याच्याफेऱ्या टाळण्यासाठी प्रशासन आपल्या गावात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरीकांच्या अडीअडचणींचे गावातच निराकरण झाले पाहिजे.बीडीओ याचे कामात लक्ष नाही घरकुल योजनेत लाभार्थ्यांना वेळेत अनुदान द्यावे. सोमवारी कंधार येथे आठवडी बाजार असतो त्यामुळे शक्यतो अधिकारी यांनी कार्यालयात राहावे असे सूचना आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केल्या शिराढोण ( ता कंधार) येथे शासन आपल्या दारी हा कार्यक्रम शनिवारी ( ५ एप्रिल ) गावात घेण्यात आला .यावेळी उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी आश्विनी जगताप, माजी सभापती प्रविण पाटील चिखलीकर, जेष्ठ नेते तुकाराम वारकड, प्रभारी तहसीलदार रेखा चामनर

गटविकास अधिकारी महेश पाटील, वन अधिकारी संदीप शिंदे, तालुका कृषी अधिकारी श्री वाठोरे ,सेवानिवृत्त शिक्षण उपसंचालक गोविंद नांदेडे, सेवानिवृत्त अति. मुकाअ शिवाजी कपाळे,माजी सभापती बाबुअप्पा मुक्कावार, उपअभियंता सुमीत पाटील, आयोजक साईनाथ कपाळे, दत्तात्रय देवणे, बाबुराव भुरे, मुक्ताराम पांडागळे, नंदकुमार देवणे, सुर्यकांत देवणे, भगवान कपाळे यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

शासन आपल्या गावात या उपक्रमाचा हेतु म्हणजे गावातील सामान्य नागरीकांच्या अडीअडचणींची गावातच सोडवणुक झाली पाहिजे, शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहचल्या पाहिजे हा आहे. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून गाळमुक्त तलाव, गाळयुक्त शिवार करण्याची संधी शेतकर्यांना मिळणार आहे, यासाठी पुर्वी लोकसहभागातून ही कामे केली जायची मात्र आता यासाठी शासन अनुदान देणार आहे, पुर्वी घरकुलाचे अनुदान एक लक्ष वीस हजार होते त्यात घर होत नाही म्हण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे घरकुल अनुदान दोन लक्ष रुपये करण्याची मागणी केली होती त्याला यश आले

पण पंचायत समिती मध्ये लाभार्थ्यांना वेळेवर अनुदान मिळत नाही काम चांगले करावे एसटी गावात आणा, संजय गांधी निराधार योजनेचा कॅम्प गावात ३० तारखेला होईल तसेच कोपन त्यांना नाही त्यांना ते मिळावे यासाठी प्रयत्न केले जातील यासह अनेक सूचना त्या त्या विभागाला ग्रामस्थांच्या समोरच आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिल्या. पुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित राहून धान्य मिळत नसलेल्या लाभार्थ्यांचे प्रश्न निकाली काढण्याच्या सुचना आमदार चिखलीकर यांनी दिल्या.

# तीन वर्षापूर्वीच तयार केलेल्या रस्त्याची चाळणी

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि.०५ एप्रिल**

तालुक्यातील शेलगाव येथील रस्त्याचे तिन वर्षांपूर्वी काम झाले होते. रस्त्याची चक्क चाळणी झाली असून आता खड्डे बुजविण्याचेही काम थातूरमातूर सुरू आहे. गावकऱ्यांनी एकत्र येऊन कामाची पोलखोल करत थातूरमातूर होणारे काम थांबविले असून या प्रकरणी तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गापासून दाभड ते शेलगांव या २.९४ किमीचे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून १ कोटी ५ लाख ९५ हजारांचा निधी मंजूर झाला होता. कंत्राटदाराकडून रस्त्यावर लावलेल्या बोर्डानुसार, ११ सप्टेंबर २०२० रोजी रस्त्याचे काम पूर्ण न करता एक वर्ष उशिरा केले. रस्ता झाल्याने वर्षभरातच रस्ता उखळायला सुरू झाला होता आता चक्क रस्त्याची चाळणी झाली असून आता रस्ता दुरुस्तीचे काम सुरू आहे.

रस्त्याची दुरवस्था व गुणवत्ता लक्षात घेता या विभागामध्ये मोठ्या प्रमाणात



भ्रष्टाचाराला वाव मिळतो काय? खडीकरण, पॅचेस, डांबरीकरणाच्या नावाखाली निधीची विल्हेवाट लावली जात असून रस्ता दुरुस्ती म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण झाले असल्याचे बोलले जात असून या कामाची चौकशी होण्याची मागणी जोर धरू लागली आहे. ग्रामीण भागात दळणवळणाच्या सुविधा पूर्णत्वास नेण्यासाठी रस्ता दुरुस्तीस शासनामार्फत महत्व देऊन अग्रस्थान दिले आहे. पण निकृष्ट रस्त्या पाठोपाठ आता दुरुस्तीचे कामही निकृष्ट होत असून याप्रकरणी तीव्र आंदोलन छेडण्याचा ग्रामस्थांनी इशारा दिला आहे.

# हजारो बहिणींचे कन्यादान करण्यासाठी व्यंकटेश शिंदेना प्रभु वैद्यनाथ बळ देईल-अशोक पटवर्धन

**परळीत शिवसेनेचा नेत्रदीपक हिंदूधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा थाटात संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.५ एप्रिल**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त परळी तालुका शिवसेनेच्या वतीने आयोजित हिंदूधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा अतिशय थाटात संपन्न झाला. शिवसेना तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे यांच्या संकल्पनेतून गत नऊ वर्षापासून अविरतपणे सुरू असणाऱ्या हिंदूधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे कौतुक करत पंचम ज्योतिर्लिंग प्रभु वैद्यनाथाच्या वास्तव्याने पावन झालेल्या या पुण्य भूमीत हजारो बहिणींचे कन्यादान करण्यासाठी प्रभू वैद्यनाथ व्यंकटेश शिंदे यांना नक्कीच बळ देतील असा विश्वास शिवसेनेचे विभागीय सचिव अशोक पटवर्धन यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या नऊ वर्षापासून परळी तालुका शिवसेनेच्या वतीने शिवसेनेचे तालुकाप्रमुख तथा हिंदू धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे मुख्य आयोजक व्यंकटेश शिंदे यांच्या वतीने प्रतिवर्षी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जाते. प्रति वर्षाप्रमाणे यावर्षी देखील शिवसेना आयोजित हिंदू धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन येथील मोंढा मार्केटच्या प्रांगणात करण्यात आले होते. या विवाह सोहळ्यात दहा जोडप्यांचे विवाह संपन्न झाले. शिवसेनेच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या सूत्रानुसार तालुक्यातील शेतकरी, कामगार, कष्टकरी, ऊसतोड मजूर अशा गरजवंत कुटुंबातील मुलींचे कन्यादान करण्याचे महान कार्य सामूहिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून शिवसेनेच्या वतीने केले जाते. अगदी निस्वार्थपणे सुरू असलेल्या शिवसेना तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे या सेवा यज्ञाचे समाजातील सर्व स्तरांमधून कौतुक होत आहे.

या सामूहिक विवाह सोहळ्यासाठी शिवसेना विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन, बीड जिल्हा संपर्क प्रमुख बापू मोरे, विजय पाटील, जिल्हा प्रमुख सचिन भैय्या मुळूक, भाजप ज्येष्ठ नेते दत्तापा इटके गुरुजी, बाळासाहेब देशमुख, रा.कॉ.तालुका अध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, अल्ट्राटेक सिमेंट कंपनी. व्यवस्थापक श्री. प्रकाश सिंग, सुरेश अण्णा टाक, रा.कॉ. शरद पवार गट तालुकाध्यक्ष देवराव लुगडे, शिवसेना ज्येष्ठ नेते रमेश चौंडे, मनसे तालुकाध्यक्ष श्रीकांत पाथरकर, व्यापारी संघ अध्यक्ष माऊली दादा फड, लक्ष्मण तात्या पौळ, रणजित दादा सोळंके, डॉ. गुरुप्रसाद देशपांडे शिवसेनेचे अतुल दुबे, मनसेचे वैजनाथ कळसकर, तुळशीराम पवार, डॉ गुरुप्रसाद देशपांडे, जाफर खान, शिवसेना माजलगाव शहर प्रमुख पापा सोळंके ,यांच्यासह परळी तालुक्यातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर पत्रकार, डॉक्टर्स, वकील आदी क्षेत्रातील मान्यवरासह परळीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वधू-वराना शुभाशिर्वाद दिले.शिवसेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सामूहिक विवाह सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे, शहर प्रमुख वैजनाथ माने, युवासेना उपजिल्हा प्रमुख संतोष चौधरी, तालुका प्रमुख बाबा सोनवणे, उपशहर प्रमुख मोहन राजमाने, तालुका सचिव विश्वनाथ राठोड, शिवसेना शहर संघटक अनिल शिंदे, कृष्णा सुरवसे, सचिन सोनवणे, सुदर्शन यादव, गोविंद गरड, अमोल गायकवाड, अनंत बोधे, रोहित शिंदे, संतोष शिंदे, रोहित शिंदे, राजेश शिंदे, विश्वनाथ सावंत, नितीन पौळ, शिवराज वाकडे, आदींसह शिवसैनिकांनी परिश्रम घेतले.





# श्रीराम जन्मोत्सव सर्व भाविक भक्तांनी मोठ्या उत्साहात साजरा करावा नवनाथ अण्णा शिराळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ एप्रिल**



श्रीराम जन्मोत्सव सर्व श्रीराम भक्तांनी मोठ्या आनंदात आणि मोठ्या उत्साहात साजरा करावा आणि श्री कंकालेश्वर मंदिर या ठिकाणावरून श्री प्रभू चंद्राची विधीवत महापूजा संपन्न झाल्यानंतर बीड शहरातून सर्वत्र श्री प्रभू रामचंद्राची मिरवणूक काढण्यात येणार आहे या मिरवणुकीमध्ये सर्व भाविक भक्तांनी लाखोच्या संख्येने उपस्थित राहून हा जन्मोत्सव साजरा करावा आणि कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घ्यावी आणि कोणाच्याही अंगावर गुलाल वगैरे टाकू नये सर्वांनी शिस्तीमध्ये श्रीराम चंद्र प्रभूची ची मिरवणूक साजरी करावी ही मिरवणूक बीड येथील प्रसिद्ध असलेले श्रीक्षेत्र कंकालेश्वर मंदिर येथून चार वाजता निघून सुभाष रोड वरून माळवेस मंदिराच्या ठिकाणावरून श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकांमध्ये जाऊन श्रीराम जन्मोत्सव मिरवणुकीची त्या ठिकाणी सांगता होईल असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

# अवकाळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई द्या-आ.संदीप क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ एप्रिल**

मागील दोन दिवसांत संपूर्ण जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकर्यांच्या पिकांचे व फळबागांचे आतोनात नुकसान झाले आहे आणि होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासनाकडे केली आहे.

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यात १ ते ३ एप्रिलच्या दरम्यान अवकाळी पाऊस झाला. या पावसाने शेतकऱ्यांच्या शेतात असलेल्या पिकांचे तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे आणि अद्यापही होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने अवकाळी पाऊस हे कारण नियमोचित दाखवून झालेल्या नुकसानीची तक्रार पीक विमा कंपनीच्या 'क्रॉप इन्शुरन्स' पवर करण्यासाठी तलाठी अर्थात महसूल आणि कृषी विभागाच्या यंत्रणेकडून शेतकर्यांना कळवावे. तसेच प्रशासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे करावेत जेणेकरून शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई मिळण्यास मदत होईल. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त तसेच जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.



# श्रीराम नवमी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा सोहळ्याचे आयोजन

**भाविक भक्तांनी लाभ घ्यावा**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ एप्रिल**

माजलगाव शहरातील नवनाथ नगर येथे सोळा वर्षापासून श्रीराम नवमी सोहळा साजरा केला जातो निमित्त याहीवर्षी अखंड हरिनाम सप्ताह व श्री ह.भ. प. परमेश्वर महाराज फपाळ यांच्या वाणीतून दिनांक ०६ एप्रिल ते १२ एप्रिल २०२५ पर्यंत शिवपुराण कथा होणार असून या कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त नवनाथ नगर महिला मंडळ माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.



प्रति वर्षाप्रमाणे गेल्या सोळा वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा संगीत कथा प्रवक्ते श्री ह.भ.प. परमेश्वर महाराज फपाळ यांच्या सुश्राव्यवाणीतून कथा होणार आहे तसेच संगीत साथ शिथवादक व गायक श्री एकनाथ महाराज कोंडवणे, तबला विशादक श्री संदीप महाराज नरके यांची साथ लाभणार आहे व विष्णू सहस्त्रनाम नेतृत्व श्री श्रीरामजी मुंदडा, ज्ञानेश्वरी नेतृत्व सौ. मीराताई डहाळे, शिवहर गायगवे यांचे असणार आहे या सप्ताहामध्ये दैनिक कार्यक्रम पुढील प्रमाणे सकाळी ०७ ते ०८ विष्णू सहस्त्रनाम,०८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, ०१ ते ०४ नामास कीर्तन भजन, मंगळवारी सुंदर कांड, ०५ ते ०६ सामूहिक हरिपाठ महिला मंडळ नवनाथ नगर व तसेच रात्री ०७ ते १० शिवपुराण कथा होईल तसेच या कथेची सांगता १२ एप्रिल रोजी श्री.ह.भ. प.परमेश्वर महाराज फपाळ यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल व महाप्रसाद श्री नरेंद्र प्रभाकर डुकरे यांच्या वतीने होईल तरी सर्व कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन नवनाथ नगर महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे

# शेतकऱ्यांच्या पीक कर्जाची सक्तीची वसुली थाबवा, अन्यथा रुमने हातात घेऊ-जिल्हाप्रमुख उल्हास गिराम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ एप्रिल**

जिल्ह्यातील शेतकरी मागील दोन वर्षापासून आसमानी आणि सुलतानी संकटा आहे. आर्थिक अडचणीत असताना शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाची बँका सक्तीची वसुली करत आहेत. ही सक्तीची वसुली बँकांनी तात्काळ थांबवावी अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हातात रुमणे घेऊन, बँक अधिकारी आणि वसुली कर्मचाऱ्यांना पळता भुई करतील. असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे.

गेवराई तालुक्यातील रांजणी येथील शेतकरी स्व.आकाश श्रीराम रोकडे यांनी आत्महत्या केली. जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी त्यांच्या कुटुंबाची सांत्वनपर भेट घेऊन कुटूंबाला आधार दिला.जिल्ह्यातील शेतकरी बांधव गेल्या अनेक वर्षापासून या ना त्या कारणाने आर्थिक संक सापडला आहे कधी पीक जो असताना अवकाळी चा फ तर कधी शेतीउत्पा साहित्याची झालेली प्रचंड यामध्ये शेतकऱ्याचे आ गणित पार कोसळले अ अशातच सोयाबीन कापस अपेक्षित दर न मिळाल्या मागील दोन वर्षापासून कापूस व सोयाबीन हे बऱ्याच शेतकऱ्यांनी घरीच साठवून ठेवला आहे. शेतीतील वाढता खर्च, वाढलेली मजुरी दर, अवकाळी आणि सरकारचे दुर्लक्ष यामुळे शेतकरी दुःखाच्या गर्तेत ओढला जात आहे.



शेतातील पीक हमीभाव येईपर्यंत प्रतिक्षा करावी की कमी दराने ावा या विवंचेत शेतकरी डला असता, राज्याचे ुख्यमंत्री तथा अर्थमंत्री त पवार नुकतेच जाहीर , 'कर्जमाफी होणार नाही , कर्ज तात्काळ भरा', आदेशामुळे बँक कर्मचारी कऱ्याकडून सक्तीची ी करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ होऊ शकते, तशीच घटना गेवराई तालुक्यातील रांजणी येथे घडली असून त्या ठिकाणी शेतकरी असलेले आकाश श्रीराम रोकडे यांनी बँकेच्या तगाद्याला

**रांजणी येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाची गिराम यांनी घेतली भेट**

कंटाळून आत्महत्या केली या आत्महत्येला सरकार आणि प्रशासनच जबाबदार आहे.अशा परिस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शेतकऱ्यांच्या सोबत असून शेतकऱ्याना वसुलीसाठी वेठीस धरल्यास हातात रुमणे घेऊन विरोध करू असे प्रसिद्धी पत्रकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम यांनी केले. या सांत्वनपर भेटी दरम्यान शिवसेना जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, तालुका प्रमुख अजय दाभाडे, नवनाथ प्रभाळे, सहशिवसैनिकउपस्थित होते.

# वयोवृद्ध लाभार्थ्यांसाठी तहसील कार्यालय बीड येथे सुविधा - तहसीलदार शेळके यांनी केली आस्थेवाईकपणे विचारपूस

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ एप्रिल**

संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजना अंतर्गत वयोवृद्ध लाभार्थ्यांसाठी तहसील कार्यालय , बीड येथे विशेष व्यवस्था करण्यात आली आहे . या उपक्रमांतर्गत तहसील कार्यालयाच्या आवारात बाकडे टाकून बसण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून , सावलीसाठीही योग्य अशी व्यवस्था करण्यात आली आहे . त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची सोयही करण्यात आली आहे.

लाभार्थ्यांना कोणतीही अडचण होऊ नये या उद्देशाने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः उपस्थित राहून लाभार्थ्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली . वयोवृद्ध व्यक्तींच्या समस्यांचा आढावा घेत त्यांनी यावेळी प्रत्येकाशी संवाद साधला आणि त्यांच्या गरजांची विचारणा केली .

कोणालाही काही अडचण आली , तर मला ९५९५१८४५४५ या क्रमांकावर थेट फोन करा , असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित लाभार्थ्यांना केले. त्यांच्या या समर्पित आणि संवेदनशील भूमिकेमुळे उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची कार्यालय प्रमुखांनी स्वतः भेट घेतली पाहिजे त्यांच्या समस्या जाणून त्यावर तात्काळ तोडगा काढावा अशा सूचना केल्या आहेत . सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी सुद्धा वेळोवेळी संजय गांधी श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांची कामे प्राधान्याने करण्यात यावी असे सर्व तहसीलदार यांना सुचित केलेले आहे . याच अनुषंगाने बीड तहसील कार्यालयात ही व्यवस्था करण्यात आल्याचे दिसून आले . बीड तालुका तसा मोठा तालुका आहे . या तालुक्यात संजय गांधी योजनेचे म्हणजेच ज्यांचा वयोगट १८ ते ६५ वर्षे आहे , त्यांची लाभार्थी संख्या ८८६० इतकी आहे . या लाभार्थ्यांना राज्य शासनामार्फत प्रतिमाह १५०० रुपये इतके मानधन देण्यात येते . श्रावण बाळ योजनेचे लाभार्थी हे ६५ वयापुढील असतात . अशा लाभार्थ्यांची तहसील बीड अंतर्गत संख्या ८८२४ इतकी आहे . ६५ वर्षावरील लोकांना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन अनुदान योजना सुद्धा असून त्या योजनेचे ३७३१ लाभार्थी आहेत . या योजनेत राज्य शासन १००० रुपये तर केंद्र शासन ५०० रुपये इतके मानधन लाभार्थ्यांना देत असते .



संजय गांधी विभागाचे नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी कळविल्यानुसार श्रावण बाळ योजना व संजय गांधी योजनेच्या ८६६४ लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आलेले असून इंदिरा गांधी योजनेच्या ३७३१ लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आलेले आहे . तथापि आधार पडताळणी न झालेले लाभार्थ्यांची संख्या ३६१६ इतकी असल्याचेही त्यांनी सांगितले .


संजय गांधी विभागाची सध्या डीबीटी पोर्टलवर लाभार्थी नोंदणी करण्याची मोहीम वेगाने सुरू आहे . यासाठी अव्वल कारकून हेमलता परचाके , महसूल सहायक वैशाली बहिरवाळ , गंगाधर जवरे यांच्यासह ऑपरेटर महेंद्र राऊत मोठ्या प्रमाणात मेहनत घेत आहेत.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने संजय गांधी , श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना बसण्याची व्यवस्था असावी , पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी असे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या लक्षात आले . तशी व्यवस्था झाली अथवा नाही याची चाचपणी करण्यासाठी त्यांनी शुक्रवार दिनांक ४ एप्रिल रोजी संजय गांधी विभागास भेट दिली . लाभार्थ्यांना बसण्यासाठी असलेल्या व्यवस्थेची पाहणी करून समाधान व्यक्त केले . लाभार्थ्यांशीही त्यांनी चर्चा केली . यावेळी त्यांनी स्वतःचा मोबाईल क्रमांक देत मला कधीही संपर्क साधा , जास्त धावपळ करू नका , उन्हातान्हाचा प्रवास करू नका असे लाभार्थ्यांना सांगितले.

यावेळी तहसीलदार शेळके यांनी लाभार्थ्यांशी चर्चा करताना सविस्तर माहिती दिली . यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की डीबीटी म्हणजेच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर नोंदणी सर्वांना करणे आवश्यक आहे . त्यासाठी लाभार्थ्यांचे आधार कार्ड हे ला मोबाईल क्रमांकास लिंक असणे अनिवार्य आहे . कुठल्याही आधार केंद्रावर अथवा महा-ई-सेवा केंद्रावर जाऊन तुम्हाला ते तपासता येईल . आधी मोबाईल क्रमांक आधार कार्डशी जोडून घ्यावा , त्यानंतर आपलं बँक खातं हे आधार कार्डशी लिंक आहे की नाही हे पहावं . त्यासाठी महा-ई-सेवा केंद्र किंवा आपले सरकार केंद्रावरून आपले आधार कार्ड बँक खात्याशी जोडले आहे का हे तपासावे . तसे ते जोडलेले नसल्यास बँकेत जाऊन ते लिंक करून घ्यावे .

वरील बाबी पूर्ण झाल्यास डीबीटीची प्रक्रिया करण्यासाठी तहसील कार्यालयात येणे आवश्यक आहे . यासाठी वयोवृद्ध लाभार्थ्यांनी कोणाला तरी सोबत आणावे . सोबत मोबाईल आणणे आवश्यक आहे . कारण डीबीटीचा अर्ज भरून घेताना त्यावर मोबाईल क्रमांक सुद्धा टाकावा लागतो . आणि लगेच त्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी म्हणजेच वन टाइम पासवर्ड जातो . तो ओटीपी सांगावा लागतो . तो ओटीपी ऑपरेटरला सांगितल्यास लगेच डीबीटीची प्रक्रिया संपते . एकदा ओटीपी दिला आणि तो ऑपरेटर मार्फत संगणकावर नोंदविण्यात आला म्हणजे डीबीटीची प्रक्रिया संपलेली असते . त्यानंतर मात्र लाभार्थ्यांनी थोडे संयमाने राहून मानधनाची वाट पहावी . शासनाकडून मानधन येण्यास आणि प्रत्यक्ष लाभार्थ्याच्या खात्यावर जाण्यास काही कालावधी लागू शकतो . अशावेळी लाभार्थ्यांनी स्वतः तहसील कार्यालयात विनाकारण चकरा न मारता फोनवर विचारणा केली तरी त्यांना तशी माहिती देता येईल . विनाकारण हेलपाटा होणार नाही . डिबीटी साठी येताना लाभार्थ्यांनी सोबत येताना आधार कार्ड , बँक पासबुक , झेरॉक्स सेंटरवरून उपलब्ध असलेला डीबीटी साठीचा अर्ज आणि राशन कार्ड चा ऑनलाईन क्रमांक सोबत आणावा . वयस्कर लाभार्थी त्यांच्या नातेवाईकांना पाठवू शकतात . तथापि ते नातेवाईक असल्याचा पुरावा त्यांना तहसील कार्यालयात दाखवावा लागेल . जेणेकरून डीबीटी प्रक्रिया करून घेता येईल.बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी काही दिवसापूर्वी आढावा घेऊन संजय गांधी विभागाने डीबीटी साठीची प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन केले होते . बीड तहसील कार्यालय अंतर्गत अद्यापही ५४०० लाभार्थ्यांची डीबीटी पोर्टलवर माहिती नोंदविण्यात आलेली नाही . यात शहर विभागातील अनेक लाभार्थी आहेत . त्यामुळे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शहरातील नगरसेवक , प्रतिष्ठित व्यक्ती यांना आवाहन केले आहे की आपण आपल्या स्तरावरून निशुल्क डीबीटी कॅम्पचे आयोजन केल्यास त्या ठिकाणी तहसील कार्यालयामार्फत ऑपरेटर आणि अधिकारी कर्मचारी पाठवता येऊ शकतील आणि ही प्रक्रिया तात्काळ करता येऊ शकेल.तहसीलदार शेळके यांची ही कृती प्रशासनाच्या जनहितकारी आणि संवेदनशील दृष्टिकोनाची साक्ष देणारी ठरली असून , या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# रामनवमी-रामरक्षा ...नित्य पठण करू राम रक्षा



करेल प्रभू श्रीराम आपली सुरक्षा! भगवान विष्णूच्या प्रमुख १० अवतारा मध्ये मत्स्य अवतार, कुर्मावतार ,वराह अवतार, नरसिंह अवतार ,वामन अवतार ,परशुराम अवतार, दशरथ राम अवतार, श्रीकृष्ण अवतार, गौतम बुद्ध अवतार आणि कल्की अवतार. यामधील श्री विष्णूंचा सातवा अवतार म्हणजेच प्रभू श्रीरामचंद्र.

चैत्र शुद्ध नवमी या दिवशी कौशल्या आणि दशरथ यांचा पुत्र त्रेतायुगातले रावणाचे अत्याचार नष्ट करण्यासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी श्रीरामचंद्रांनी जन्म घेतला. एक वचनी, एक पत्नी ,संयमी प्रतिकूल परिस्थितीतही मन स्थिर ठेवणाऱ्या श्री रामचंद्रांची जयंती रामनवमीच्या दिनी दुपारी बारा वाजता जन्म सोहळा आनंदाने उत्साहाने साजरा केला जातो. भक्तांच्या कल्याणासाठी आणि रक्षणासाठी राम रक्षा या महान स्तोत्राचे भगवान शिव यांनी बुध कौशिक ऋषीच्या स्वप्नात जाऊन सांगितले आणि त्यानंतर बुध कौशिक ऋषी यांनी राम रक्षा हे स्तोत्र संस्कृत मध्ये लिहून काढले .या स्तोत्रामध्ये एकूण ३८ श्लोक आहेत यामध्ये सुरुवातीलाच विविध नावांसह विविध अवयवांची डोक्यापासून पायापर्यंत क्रमाने नावे घेत त्या त्या अवयवाचे श्रीराम प्रभूंनी रक्षण करावे अशा आशयाचा मजकूर दिसून येतो .त्यामध्ये मस्तक, कपाळ, डोळे, कान, नाक, तोंड, जिभ ,कंठ ,खांदे मनगटापर्यंत हात ,हाताचे पंजे, हृदय ,शरीराच मध्यभाग ,बेंबी, कंबर, मांडी गुडघे, पोटऱ्या आणि पावले. अशा २० अवयवांचा क्रमाने उल्लेख केला आहे. त्याचबरोबर त्यामध्ये रामस्तुती, रामाची प्रार्थना आणि भक्तांचे पापनाश करण्यासाठी शंभर कोटी श्लोक विस्तृत अशी रामरक्षा आहे .

विज्ञानाची कास धरून विचार केला तर रामनाम उच्चारले असता बेंबीच्या देठापासून दीर्घ श्वास सोडताना शरीरातील घातक सूक्ष्मजीव बाहेर पडतात. त्याचबरोबर राम रक्षा मधील प्रत्यक्ष शब्द हा शक्तिशाली मंत्र आहे ज्याने पोटाचे विकार नष्ट होतात .

त्याचबरोबर ज्या ठिकाणी रामरक्षा स्तोत्र रोज म्हटले जाते तेथे नित्य सात्विक, शांत, सकारात्मक आणि पवित्र स्पंदने निर्माण होतात .स्तोत्र म्हणणे एक प्रकारचे स्तवन .उपास्य देवतेचे तेज पठणकर्त्याच्या शरीरात प्रवेश करते आणि त्याचे मन प्रसन्न होते .

- ✻ चिंता कमी होते
- ✻ शांत झोप येते
- ✻ आत्मविश्वास वाढतो
- ✻ मनशांती मिळते
- ✻ वास्तुदोष नष्ट होतात
- ✻ एकाग्रता वाढते
- ✻ इच्छापूर्ती होते .

त्याचबरोबर लहानपणीच मुलांना जर रामरक्षा शिकवली, त्यांच्याकडून पठण करून घेतली तर त्यांचे उच्चार स्पष्ट . मुलांमध्ये असणारा तोतरेपणा ,बोबडेपणा, जीभ जड पडणे हे विकार दूर होतात. मनोबल वाढते, अभ्यासामध्ये प्रगती दिसून येते त्याचबरोबर इतर कसल्याही प्रकारचा दोष जवळ फिरकत नाही .या स्पर्धेच्या धकाधकीच्या जीवनामध्ये मनशांती मिळविण्यासाठी, आरोग्य संपदा जपण्यासाठी रामरक्षा हे अतिशय फलदायी स्तोत्र आहे.त्यातील प्रत्येक श्लोक आपले रक्षण करते. अबाल वृद्धांनी आज रामनवमी राम जन्मदिनी रामरक्षा' म्हणण्याचा, ऐकण्याचा संकल्प केला तर निश्चितच फलप्राप्ती होईल'' जय श्रीराम' धन्यवाद !

**-सो.अश्विनी वासुदेवराव टेकाळे (जोशी)**

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com